ॐ

# छात्र प्रबोधन

वर्ष २, अंक १०
सौर वैशाख, शके १९१६

इवली शल्ये रुपती खुपती, मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख लेऊनी, ने ज्योतिर्जगतात

**ज्ञान प्रबोधिनीद्वारा कुमारांसाठीचे अभिनव मासिक!**

## ईशान्य भारताच्या दौऱ्यावर



सुट्टी घालवू नका वापरा! विविधांगी अनुभव घ्या!

**छात्र प्रबोधन**

हे मासिक **'ज्ञान प्रबोधिनी'** या संस्थेच्या मालकीचे असून सौर ४ वैशाख शके १९१६ (२४ एप्रिल १९९४) या दिवशी प्रभात प्रिंटिंग प्रेस, गुलटेकडी येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिद्ध केले.

**✹ संपादक, प्रकाशक ✹**
श्री. महेन्द्र सेठिया

**✹ संपादक मंडळ ✹**
महेन्द्र सेठिया B.E.M.ED
विवेक पोंक्षे, M.sc., B.Ed
अनघा लवळेकर, M.A.,B.Ed
शैलजा देशमुख M.A.,B.Ed

**✹ रेखाचित्रकार ✹**
श्री. दीपक संकपाळ

**✹ संपर्क ✹**
**'छात्र प्रबोधन'**
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ
पुणे - ४११ ०३०.
☎ ४३२६९१

**✹ मुद्रक ✹**
प्रबोध संपदा,
पुणे - ४११ ००२

**✹ वार्षिक वर्गणी ✹**
रु. ४०/-

**✹ नोंदणी क्रमांक ✹**
PHM/153/VIII

**..निव्वळ मासिक नव्हे! ..कृतिशील उपक्रमांचा स्रोत!**

## या अंकात दडलंय काय?

✹ सुखद पण अस्वस्थ करणारा पूर्वांचल प्रवास २
✹ कविता पानोपानी ७
✹ शिवरायांचे आठवावे रूप ८
✹ करून तर पाहा १०
✹ विषय गेले पळून - एकांकिका १२
✹ असे घटते सुंदर अक्षर! १७
✹ प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास - गोष्ट लिहून तर पाहा २२
✹ नेफा - एक अविस्मरणीय नामुष्की - २ २५
✹ वाचलेच पाहिजे असे काही! ३०
✹ खेळ खेळून तर पाहा! ३१
✹ विज्ञानाच्या चष्म्यातून ३२
✹ माझ्या शिक्षणाची सुरुवात ३५

## पानाखालील ओळी मिळवा

आत्तापर्यंत प्रत्येक अंकामधील पानाखाली दिलेल्या कवितेतील ओळी, सुविचार, म्हणी इ. तुम्ही वाचल्या असतील. या अंकातील पानाखाली ओळी भरण्याचे काम यावेळी आम्ही तुमच्यावर सोपविणार आहोत. पानावरील मजकूरास अनुरूप असे सुविचार, काव्यपंक्ति, स्वरचित काव्य इ. पैकी काहीही खाली असलेल्या मोकळ्या ओळीत लिहा. नंतर एका कागदावर पान क्रमांक व ओळी लिहून आमच्याकडे पाठवा.

**स्पर्धेसाठी सूचना**

१) सुविचार हे मराठी, हिंदी, संस्कृत व इंग्रजी यांपैकी कोणत्याही भाषेत असले तरी चालतील.
२) ओळी ह्या सुबोध, सुटसुटीत व पानावरील विषयाशी संबंधित अशाच असाव्यात.
३) शक्यतो पूर्णत: नवीन ओळी मिळवा. चार अथवा पाच ओळी (आत्तापर्यंतच्या ९ अंकात न आलेल्या) पूर्वीच्या अंकातील असल्या तरी चालतील.
४) बक्षिसे प्रथम क्रमांक रु. २५/-
द्वितीय क्रमांक रु. १५/-
(वरील बक्षिसे पुस्तक रूपाने मिळतील)

# संवाद

प्रिय प्रबोधक मित्र मैत्रिणींनो,

*सुट्टी लागली आणि नेतृत्व प्रशिक्षण शिबिरासाठी गावाहून उत्साही मुले, मुली यायला सुरुवात झाली. हा अंक तुमच्या हातात पडेल तेव्हा या मुलामुलींनी घेतलेल्या शिबिरांमध्ये तुमच्यापैकी अनेकजण सामील झाला असाल. १७ एप्रिल पासून २० एप्रिल पर्यंत झालेल्या या शिबिरांत ७० मुले आणि ३५ मुली सहभागी झाल्या होत्या. नेतृत्वाचे विविध पैलू व्याख्यांनातून समजावून घेत असताना नेतृत्वासाठी आवश्यक असणाऱ्या काही कौशल्यांचा सरावही या शिबिरार्थींनी मोठ्या उत्साहात केला. या शिबिरासाठी धुळे, लातूर, नाशिक, सोलापूर, सांगली, राजगुरुनगर आणि पुणे येथून प्रबोधक आले होते. वाईट एकाच गोष्टीचे वाटले की १७०० सभासद असणाऱ्या पुण्यासारख्या शहरातून मात्र मोजकेच सभासद आले होते. यापूर्वी झालेल्या मेळाव्यांना पुण्यातला प्रतिसाद इतर गावांपेक्षा कमी होता. याचा पुणेकर सभासदांनी जरूर विचार करावा.*

*गेला महिना या शिबरांच्या नियोजनासाठी बराच धावपळीत गेला तथापि छात्र प्रबोधनचा हा नवा उपक्रम यशस्वी होणे खूप महत्त्वाचे होते. त्यामुळे हा अंक वासंतिक विशेषांक म्हणून प्रकाशित न होता पुढचा अंक विशेषांक म्हणून प्रसिद्ध करायचे ठरविले आहे.*

*मे महिन्याची सुट्टी जरा योजनापूर्वक घालवायला हवी. पुस्तकी अभ्यासापेक्षा काहीतरी वेगळे शिकण्याची संधी म्हणून सुट्टीकडे बघितले पाहिजे. नुसता खेळ व टी. व्ही यातच आपला बराच वेळ जातो. या सुट्टीत जरा आईच्या मागे लागून सोपे सोपे खाद्यपदार्थ तयार करायला शिकून घ्या. खिचडी, पोहे, शिरा असे पदार्थ आपल्याला चटकन् आणि चविष्ट बनवता आले तर सहलींमध्ये मित्रमैत्रिणीतला आपला भाव वधारतोच पण स्वरचित कलाकृतीचा आस्वाद घेण्यातली गंमत तर काही न्यारीच!*

*दररोज थोडा तरी वेळ जाणीवपूर्वक वाचनासाठी वेगळा काढा. 'छात्र प्रबोधन' मधून ज्यांचा परिचय झाला आहे अशी पुस्तके ग्रंथालयातून मिळवून जरूर वाचा एखादे पुस्तक वाचत असताना त्यातील पात्रांच्या भूमिकेत शिरा म्हणजे पुस्तकाची गोडी आणखी वाढेल.*

*वाचण्याबरोबरच काहीतरी लिहून बघा, तुमचा प्रतिभेच्या प्रांतातून आत्तपर्यंत बराच प्रवास झाला आहे त्यातील तंत्रे वापरून कविता, गोष्टी लिहिण्याचा प्रयत्न करा. तुमचे हे लेखन म्हणजे तुमची स्वत:ची निर्मिती असेल. त्यामुळे ती कशीही असली तरी त्यातून तुमचा उत्साह व आनंद वाढेल.*

*असे काही तरी नवे शिकत, नवे निर्माण करत ही सुट्टी आनंदात घालवा.*

सस्नेह तुमचा,

**महेंद्र सेठिया**

# सुखद पण अस्वस्थ करणारा पूर्वांचल प्रवास

**– सचिन गाडगीळ, पुणे**

स्थळ मुंबई T.V. चा प्लॅटफॉर्म. सकाळचे सात – साडेसात वाजताहेत. बहुदा स्टेशनात परगावाहून कोणतीतरी गाडी येण्याची वेळ होतेय. प्लॅटफॉर्मवरची हमालांची गडबड वाढत चाललीय. अचानक एक दीर्घ शिट्टी वाजते. लाल डगल्यातले हमाल भराभर एका रांगेत उभे राहतात. पटापट एकमेकांपासून सात आठ फुटांवर रुळांना समांतर असे खो–खोच्या खेळाडूंसारखे पवित्रा घेऊन बसतात. क्षणभर आमचा आमच्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. आपण शाळेच्या मैदानावर तर नाही ना? असे वाटून आम्ही स्वत:ला चिमटे घेऊन पाहिले. पण आश्चर्याचे धक्के पुढेच बसणार होते. हे तर फक्त On your mark set इतकेच होते. चाकांवर ब्रेक दाबत दाबत हळूहळू गाडी स्टेशनात दाखल झाली. इकडे इंजिनातील गतिदर्शकाने शून्याची गाठ घेतली आणि तिकडे And go ची दुसरी शिट्टी वाजली. (नशीब हमालांच्या त्या मास्तरांच्या हातात स्टार्ट द्यायला पिस्तोल नव्हतं ते) आणि क्षणार्धात Perfect Start घेऊन सारे हमाल त्यांच्या समोर थांबलेल्या डब्यांमधल्या पाशिंजर लोकांच्या ब्यागांकडे धावले ना? आपल्या पी.टी.उषा वगैरे मंडळींनाही इतका Perfect Start जमला नसेल. व्ही.टी. च्या प्लॅटफॉर्मवर भारतीय सैन्यातच बघायला मिळेल असली शिस्त पाहून आमचे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले पण एक किडा डोक्यात वळवळलाच. ही लाल डगलेवाल्यांची शिस्तबद्ध सेना यंत्राच्या चाकाला बांधलेल्या मुंबईतील आहे म्हणूनच हे शक्य आहे उर्वरित देशाचे काय? पण पुढे आणखी धक्के बसणार होते.

साडे दहा वाजता आम्ही गीतांजलीत बसलो आणि स्वत:ला पुढचे ७० एक तास भारतीय रेल्वेच्या ताब्यात देऊन टाकले. भारतीय सहजीवनाचे अस्तित्व प्रवासात ठायीठायी अनुभवायला मिळते म्हणजे पहा ना ! आमची गीतांजली हावरा स्टेशनवर चार तास उशिरा पोहोचली म्हटलं चला आता कलकत्यात मुक्कामासाठी जागा शोधा. कारण मनाशी अगदी खात्री होती की बेटे हो आता पुढे गोहाटीला नेणारी कामरूप कधीच निघून गेली असणार. पण छे! भारतीय सहजीवनाचं बाळकडू इथल्या आगगाड्यांनाही मिळालेलं आणार. त्यामुळे कामरूप बिचारी आमची वाट बघत अजूनही यार्डातच पडून होती.

मुंबई हावरा ३५ तासांचा पहिला टप्पा तर सहज पार पडला होता. आता

कामरूपमधून गोहाटीकडे दुसरा टप्पा होता. बंगालचा उभा छेद घेत कामरूप धावत होती. (आदले दोन दिवस भारताचा आडवा छेद गीतांजलीने घेऊन झाला होता.) जीवशास्त्रात शिकलेले हे उभे आडवे छेद इथे खऱ्या अर्थाने समजतील असे कधी वाटले नव्हते. खरे तर शाळेचा अभ्यास करताना न उमजलेल्या अनेक गोष्टी समजून घेण्यासाठी आम्ही निघालो होतो. गंतव्यस्थान होतं ईशान्य भारत. आमच्यामध्ये विवेक आणि गिरीशराव हे दोघे पूर्वी त्या भागात हिंडून आलेले तर मनोज, महेंद्र आणि मी पहिल्यांदाच चाललेलो. हावऱ्यापर्यंत फारसा प्रश्न नव्हता. सारेच वातावरण तसे परिचयाचे वाटत होते. हावऱ्याच्या पुढे मात्र बदलता परिसर जाणवायला लागला. क्षितिजापर्यंत पसरलेल्या भातशेतीतून आमची गाडी धावत होती. फेब्रुवारी-मार्चमध्येही हिरवीगार दिसणारी भातशेते, त्यांना पाणी देणारी छोटी छोटी तळी शेताडीतून मध्येच उठून दिसणाऱ्या गडद हिरव्यागार वृक्षराया आणि त्यात लपलेली छोटी छोटी गावे. सुजलाम् भारताचं वर्णन बंकिमचंद्रांनाच का स्फुरावं याची खूण पटवत बंगाल मागे पडत होता. हावरा सोडल्यापासूनच गाडीत मिष्टी मिष्टीऽऽ आवाज येऊ लागले होते. सोनपापडी तोंडात कोंबत आम्ही कर्जतच्या बटाटेवाड्याची आठवण बुजवून टाकली आणि येणाऱ्या नव्या नव्या पदार्थांना सामोरे जाण्यासाठी सज्ज झालो.

मध्येच लक्षात आले की मागे पडणाऱ्या रेल्वे स्टेशनवरची बंगाली लिपीतली अक्षरे अदृश्य झाली आहेत तेव्हा पत्ता लागला की गाडी बिहारमधून धावते आहे. गाडीने हा आडवळणी मार्ग पत्करला आहे की बिहारचाच भाग धसमुसळेपणा करत बंगालच्या बगलेत शिरला आहे हे कळायला मार्ग नव्हता. किशनगंगा स्टेशनवर गाडी थांबली आणि आडमाप बिहारमध्येही चक्क शिस्त असते हे बघून याची देही याची डोळा तृप्त झालो. फलाटावर प्रत्येक त्रिकूटात एक चहावाला, एक वडेवाला आणि एक पान-सिग्रेटवाला प्रत्येक त्रिकूटाची जहागिर आखून घेतलेली. त्यातील गिऱ्हाइकांनी इतरांच्या जहागिरीत जायचे नाही. इतकी शिस्तशीर स्पर्धा रिसायन्स वगैरे मंडळीत झाली तर!

किशनगंगा मागे सोडून आम्ही परत बंगालमध्ये शिरलो. न्यू जलपायगुडी, न्यू फकिराग्राम, न्यू बोंगरगाईम अशी 'न्यू' गावे लागत होती. एके काळी जुन्या मीटरगेज मार्गावरची ही स्टेशने ब्रॉडगेजवर येऊन नवी झाली होती. ब्रॉडगेजने ह्या भागाचा विकासाचा मार्ग रुंद केला आहे हे खरेच. पण खरी गरज आहे ती या मार्गांनी मोकळ्या मनांवा संवाद साधला जाणं.

ईशान्येचं जणू प्रवेशद्वार असलेलं न्यू अलिपूरद्वार हे बंगालमधलं शेवटचं स्टेशन मागं टाकून आता आम्ही आसाममध्ये प्रवेश करत होतो. आसाम! ईशान्य भारतातील सप्तभगिनींमधील सगळ्यात मोठी बहीण.

एकेकाळी सारा ईशान्य भारतच आसाम प्रांत होता. आज तरी त्याची वाटणी सात राज्यांत झाली आहे. भविष्यात आणखी किती विभाजन होणार? कोणास ठाऊक?

गोहाटीजवळच्या ब्रह्मपुत्रेचा पूल ओलांडत असताना जोरदार पावसाने आमचं स्वागत केलं. हवेत चांगलाच गारवा होता. एकूणच ईशान्येचा सारा प्रवास महाराष्ट्राच्या चुलीतून ईशान्येच्या फ्रीझमध्ये असाच झाला होता. गोहाटीहून विवेक, महेंद्र, आणि गिरीशराव अरुणाचलला जाण्यासाठी निघाल तर मी आणि मनोजने शिलाँगचा रस्ता धरला.

ईशान्येतील परिस्थिती दिववसेंदिवस बिघडतच चाललेली जावणत होती. वाटेत प्रवासी वाहतुकीच्या बरोबरीने सैन्याच्या गाड्या दिसत होत्या. तासा दोन तासांनी चेकपोस्टाशी गाडी उभी करून आतल्या माणसांची सामानासुमानासह झडती घेतली जात होती. कहाँसे आएँ? क्यों आए? कहाँ जाएंगे असे उर्मट प्रश्न विचारले जात होते. इथल्या माणसांना ते आता कदाचित सवयीचे झाले असले पण महाराष्ट्रासारख्या सुरक्षित प्रदेशात राहाणाऱ्या तुम्ही आम्हाला ते जरा विचित्रच वाटतं. या सगळ्यात कळस असा अनुभव विवेक आणि महेंद्रने घेतला. तिनसुकियाहून दोघेही काझिरंगा अभयारण्याकडे यायला निघाले. रात्री एक दीडचा सुमार असेल. कंडक्टरने सांगितले, ''भई! काझिरंगा आ गया! आप यहाँ उतरिए!'' उतरले दोघे. तिथे जवळपास हॉटेलच्या एक दोन इमारती पण कोणीही दार उघडायला तयार नाही. आजूबाजूला मिट्ट काळोख. भयाण शांतता. शेवटी चार-पाच मिनिटाच्या अंतरावर एक पोलिस चेकपोस्ट दिसले. आठ दहा जवान हातात बंदुका घेऊन पाहारा करताहेत. त्या झोपडीवजा चेकपोस्टमध्ये त्यांचा प्रमुख बसला आहे. शेजारी वाळूच्या पोत्यांचे बंकर्स उभारले आहेत. पलीकडे वॉचटॉवरवरून सर्चलाइटचा झोत टाकला जातो आहे. येणारे जाणारी वाहने थांबताहेत. त्यात हे दाढीवाले तरुण एकदम त्या इन्स्पेक्टरच्या पुढ्यात दाखल. मला तर वाटतं त्या दोघांच्या दर्शनाने पोलिसच क्षणभर हादरले असतील. उल्फाचे अतिरेकी तर नाही ना? मग आम्ही प्रवासी आहोत हे पटवून देता देता त्या दोघांची ही पुरेवाट. शेवटी त्या पोलिसांना ही निरुपद्रवी मंडळी आहेत हे पटल्यावर चेकपोस्टच्या बाहेर (आत नाही बरं!) झोपण्याची उदार परवानगी. एकूण त्या चेकपोस्टमुळे जनतेचे रक्षण बिक्षण किती होत असेल याबद्दल शंका यावी असाच तेथे सारा व्यवहार होताना पाहिला. येणाऱ्या जाणाऱ्या ट्रक चालकांकडून पन्नास शंभर रुपयांची खंडणी गोळा करणे एवढेच तेथे चाललेले दिसत होते.

इकडे मी व मनोजने बस प्रवासाचा मस्त अनुभव घेतला. दिसला डोंगर की घाल वळसा असा लांबलचक नागमोडी वळणे घेत, वर खाली चढत उतरत मार्गक्रमण

चालले होते.

एकूणच मेघालय आणि मणिपूर ही डोंगराळ राज्ये. मेघालय वसलं आहे गारो आणि खासी टेकड्यांवर तर मणिपूर पटकोई डोंगररांगेच्या माथ्यावर, अशा प्रवासात क्वचित कधीतरी दुसरे वाहन दिसायचे. मध्येच एके ठिकाणी बस थांबली, ड्रायव्हर उतरला आणि कोठल्या तरी दिशेला अदृश्य झाला. एक तास झाला, दोन तास झाले, ड्रायव्हरचा पत्ताच नाही. अन् मग पत्ता एवढाच लागला की ड्रायव्हर आता येत नाही. प्रवाश्यांना तिथेच सोडून तो पळून गेला होता. मग काय 'ठेविले अनंते तैसेची राहावे' करत दुसऱ्या बसची वाट पाहात बसणेच हातात होते. कित्येक तासांनी दुसरी बस आली. नवा गडी नवे राज्य तसे नवी बस नवे तिकिट काढत प्रवास पुढे सुरू झाला.

या सगळ्या भागातले एकूण जीवनच संथ. वेळेशी स्पर्धा करण्याचा स्वभावच नाही. लाहे, लाहे (सावकाश, सावकाश) हा इथला जणू मंत्रच. वेगवान जगापासून आपला संबंध तुटत चालला आहे. याची जाणीव आता कोठे झाली आहे. विपुल साधन संपत्ती असूनही प्रतिकूल हवामान, येणारे पूर, कोसळणाऱ्या दरडी यामुळे प्रगतीचा वेग खूपच कमी. त्यातच स्वत:ची ethnic identity जागृत होत असताना आपण कोणीतरी वेगळे आहोत अशीही भावना जागृत होताना दिसते आहे.

साऱ्या भारतापासून तुटली गेलेली माणसांची बेटे जागोजागी भेटतात. ईशान्य भारतात हे प्रमाण जरा जास्तच याचा अनुभव हे प्रमाण जरा जास्तच याचा अनुभव सचिन-मनोजने मोइनाथोला पाड्यात घेतला. रियांग जमातीचं हे छोटसं गाव. गावातल्या कुणालाच इंग्रजी, हिंदी समजत नाही. मग मकधी दुभाषा बरोबर तर कधी खाणाखुणांनी संभाषण सुरू राहिलं. उंच बांबूवर बांधलेली बांबूचीच घरं, घरांच्या खालच्या भागात डुकरं आणि कोंबड्या यांचा निवास. उदरनिर्वाह फिरत्या शेतीवर अवलंबून. सारी शेती धानची (भाताची). घरात शेतात लागणारं सारं साहित्य लाकूड नाही तर बांबूच. कापूस पिकवून त्यापासून कापड विकण्यापर्यंत सारेच घरी करायचे. एवढेच काय पण त्या कापडाला द्यायचे रंगही घरीच तयार करायचे. भात, मासे केळी, कंदमुळे हे अन्न,एकूणच यंत्रयुगाचा स्पर्शही न झालेलं सारं जीवन.

मोईनाथोल येथील रिआंग जमात ही ईशान्येतल्या असंख्य जमातीतील एक जमात. त्यातही सपाटीवरच्या करबी, बोडोंसारख्या जमाती राजकीयदृष्ट्या आज जागृत होताहेत. खासी, गारो, नागा, मिझो कुकी, आदी, निशि, इदू सारख्या डोंगराळ भागातल्या जमाती आधीच जागृत झाल्याने मेघालय, नागालँड, मिझोराम, अरुणाचल या राज्यांची निर्मिती झालेली. मग राजकीय स्वायत्तता आणि प्रगती हातात हात घालून चालतीलच असे नाही. याचे प्रत्यंतर मणिपूरमध्ये वारंवार येत होते. तेथे नागा-

कुकी संघर्ष वणव्यासारखा पेटलेला. आज मणिपुरात राष्ट्रपती राजवट होती. इंफाळसारख्या राजधानीच्या शहरात महिन्यात ८, १० दिवस संचारबंदी केवळ शासन आणि सैन्य यांच्या मदतीने इथले प्रश्न सुटणार नाहीत. त्यासाठी स्वत:ला गाडून घेऊन इथल्या समाजासाठी काम करणारे तरुण तरुणी हवे आहेत. आशा पालवणारे असे अनेक तरुण आम्ही या दौऱ्यात पाहिले. सिल्व्हरच्या कल्याणश्रमाच्या वसति-गृहाच्या माध्यमातून आजूबाजूच्या जनजीवनाशी एकरूप झालेला तयेश त्रिपाठी बिहारमधून इथे आला आहे. अरुणाचल प्रदेशात १९७५ साली मी किमान वीस वर्षे येथे राहाणार आहे असा संकल्प आकारून आलेले जयंत जोशी आम्हाला भेटले. जयरामपूरच्या शाळेत प्राचार्यपदाची धुरा वाहणारा केरळचा राधाकृष्णन अन् ताफ्रागाव सारख्या अडचणीच्या जागी अनेक वर्षे काम करणाऱ्या अपर्णा दीदीही भेटल्या. राधाकृष्णन् तर मद्रासच्या आय.आय.टी. मधून कॉम्प्युटर सायन्समधली एम्.टेक. पदवी घेऊन येथे कामाला आला. असे प्रेरित झालेले युवक युवती इथल्या मुलामुलींच्यात प्रेरणा निर्माण करताहेत.

आपण सारे खरेच एक आहोत का? असा प्रश्न प्रवास करताना अनुभवलेली विविधता पाहून मनात उभा रहात होता. जसजसे आपण माणसांच्या जवळ जातो तशी आंतरिक एकता जाणवायला लागते. विवेक आणि महेन्द्र कुद्दुम नावाच्या छोट्या गावात गेले होते. गाव होते तांगसा जमातीचे. दोन तीन तास गावातील एका घरात घालवले. पाहुणचार घेतला आणि सहज व यजमानांना विचारले तुमच्याकडे बांबूची एखादी वस्तू विकत मिळेल का? यजमानांचा चेहरा विचारमग्न झाला. तोच त्या घरातलं एक दुसरीत जाणारं पिल्लू झटकन् माळ्यावर चढले आणि तिथून त्याने काढले एक छोटेसे बांबूचे वाद्य. मोठ्या आत्मियतेने ते स्वत:चे वाद्य त्याने प्रेमाने भेट दिले. आपल्या घरात दररोज उम्टणारे आनंदाचे सूरच जणू दूर देशीच्या पुण्यातल्या एखाद्या घरात उमटण्यासाठी त्यांच्या हवाली केले होते.

इथल्या आणि तिथल्या माणसांमध्ये अनेकानेक पूल बांधण्यासाठी आपण हे उज्ज्वल आशांचे आनंदी सूर त्यांच्याकडून स्वीकारायला हवेत. राम होणं जमणार नाही कदाचित प्रत्येकाला, पण खार होणं निश्चितच आवडेल. अशा अनेक खारींची फौजच उत्तर आहे ईशान्य भारतातल्या प्रत्येक प्रश्नाला.

***

## चूहा बोला

पानी की टंकी पर चढ़ कर
नन्हा चूहा बोला ।
बिल्ली मौसी अब मत समझो
हम को इतना भोला ।। १ ।।
दादा परदादा को खाया
हमें नही खा पाओगी ।
भूल से उपर मत आना
वरना पछताओगी ।। २ ।।
हम ले कर बैठे है मौसी
हाथ में मोटा डंडा ।
एक हाथ में हो जाएगा
जोश तुम्हारा ठंडा ।। ३ ।।

**शुभा राठी, रेशमा शेख**
७ वी, (ज्ञान प्रबोधिनी), सोलापूर

---

## आकाशाची सफर

मला वाटते पंख फुटावे,
उडत उडत आकाशी जावे,
अंतराळ ही ओलांडुनिया,
स्वर्गामधले सुख पाहावे ।।धृ।।
पाहुणे बनुनी इंद्राचे,
दर्शन घ्यावे चंद्राचे,
उतरुनी त्यावरी अलगद,
वसुंधरेचे रूप बघावे ।।१ ।।
विष्णुंकडे भोजन करून,
तृप्त करावे अपुले मन,
मग घेईन दर्शन शिवाचे,
वाटेल ते लोची बसावे ।।२ ।।
देवेंद्राची पाहून वाडी,
अमृताची चाखुन गोडी,
येऊनी परत अपुल्या घरी,
कुशीत आईच्या झोपावे ।।३ ।।

**निर्मिती सारंग कोलते**, ८वी क, सांगली.

## निसर्गाचा राग

भारतात हर्षद मेहता येतो
शेअर बाजारात घोटाळा होतो
भ्रष्टाचार अनीति करून जातो
पंतप्रधानांवर पैशाचा आरोप करतो
हर्षद मेहतावर खटला भरतो ।।
काही दिवस जातात
दाऊद इब्राहीम येतो
मुंबईत तेरा बॉम्बस्फोट करतो
लाखो रुपयांचे नुकसान करतो
मेननला स्फोटात सामील करतो ।।
पप्पू कलाणी, हितेंद्र ठाकूर येतात
बेकायदा मोठ्या इमारती बांधतात
गरीबांची जमीन लुबाडतात
मंत्र्यांनाच पाठीशी घेतात
ह्या पापाचे ओझे झाले
भूकंपाचे वारे आले
अनेक भूभाग दणाणून गेले
अनेक गावांना पुसून टाकले
असंख्य बेघर केले
त्यात हात धुवून घेणारे श्रीमंत झाले ।।
पण माझ्या बोलमनाला प्रश्न पडला?
निसर्गाने असा कोप का केला?
चुका केलेले सुटले भराभर
निसर्गाने का काढले
वड्याचे तेल वांग्यावर ।।

**वैभव आराध्ये**, ७वी, लातूर

---

## 'घर'

छोटसं घर असावं
विश्वासाच्या पायावर उभारलेलं
प्रितीच्या विटांनी बनलेलं
आनंदाच्या छतांनी झाकलेलं
प्रेमाच्या दरवाज्याने सजलेलं
असंच असावं छोटसं घर, स्वर्गाहून सुंदर

**ज्योती हडदरे,** हडपसर, पुणे

# शिवरायांचे आठवावे रूप

**– ॲड. आनंद रा. देशपांडे, सोलापूर**

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

परीक्षा संपवून सुट्टीची मजा लुटायला तुम्ही सर्वांनी सुरुवातही केली असेल. खाणे–पिणे, खेळणे इ. प्रकारच्या मजेचा थोड्याच दिवसात कंटाळा येऊ लागतो. सुट्टीत काहीतरी वेगळे केले पाहिजे. भिंतीच्या पलिकडे जाऊन उघड्या डोळ्यांनी जग बघितले पाहिजे असे वाटतं ना! सनावळ्यांच्या कचाट्यात अडकलेला इतिहास शिकताना अगदी नको केलं होतं असंच ना! पण हाच इतिहास प्रत्यक्ष शिकताना अगदी जेथे घडले तेथे जाऊन अनुभवायचा म्हटलं तर! मला खात्री आहे तुम्हाला तो नक्कीच आवडेल. कदाचित मी सुचविलेला उपक्रम तुम्हाला यंदाच्या वर्षी करून बघता येणार नाही पण तुम्हाला जर ही कल्पना आवडली तर आम्हाला जरूर कळवा. आपण पुढच्या वर्षी आधीपासून योजना करून तुम्हा सर्वांना साक्षात इतिहास काळाचा अनुभव देण्याचा प्रयत्न करू.

या एप्रिल महिन्याच्या २५ तारखेस हनुमानजयंती आहे. चैत्र शुद्ध पौर्णिमा. त्याच दिवशी असते छत्रपति शिवाजीमहाराजांची पुण्यतिथी. शिवतीर्थ रायगडावर त्यादिवशी खूप मोठा उत्सव असतो. तुम्हाला आश्चर्य वाटेल, पुण्यतिथीला कुठे उत्सव साजरा करतात का? मृत्यूचा का कुठे सोहळा साजरा होतो? पण मित्रांनो, महापुरुषांचे मृत्यूही सामान्य लोकांना प्रेरणादायक असतात. त्यांचे जीवनकार्य जसे समाजाला प्रेरणादायक ठरते. तसा त्यांचा मृत्यूही निद्रिस्त समाजशक्तीला जागृत करू शकतो, चेतवू शकतो. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी एके ठिकाणी म्हटलं आहे,

'आपुले मरण देखिले म्या डोळा, तो जाहला सोहळा अनुपम्य' तेव्हा महापुरुषांचे मृत्यू हे ही उत्सवच असतात. संभाजी महाराजांना ज्या प्रकाराने मृत्यू आला; व ज्या धैर्याने त्यांनी तो स्वीकारला ते पाहून मराठी सेना जी चवताळून उठली, ती औरंगजेबाच्या मृत्यूनंतरच विसावली. मूळ मुद्दा असा की येत्या २५ तारखेस शिवाजी महाराजांची पुण्यतिथी आहे. महाराष्ट्राच्या काना–कोपऱ्यातून त्यादिवशी माणसे तेथे येतात. रात्री जगदीश्वराच्या देवळात कीर्तन होते. पहाटे हनुमानजयंतीचे

कीर्तन होते त्यानंतर जगदीश्वराला व शिवाजी महाराजांच्या समाधीला अभिषेक होतो. मग सारे जण छत्रपतींच्या सिंहासनासमोर राज्यसभेत एकत्र येतात. तेथून समाधीपर्यंत शिव-छत्रपतींच्या प्रतिमेची पालखी वाजत-गाजत पोवाडे गात नेली जाते. पालखीपुढे कोणी लेझिम खेळत असतात, कोणी लाठी-बोथाटी फिरवत असतात. असा हा उत्सव दुपारी संपतो. सारी गर्दी गड उतरून निघून जाते आपण मात्र गडावरच थांबायचं. संध्याकाळपर्यंत भवानी टोक किंवा टकमक टोकापर्यंत फिरून यायचं. रात्री चांगला चांदीच्या परातीएवढा चंद्र जगदीश्वराच्या कळसाआडून येईल. पौर्णिमेच्या शुभ्र दुधासारख्या चांदण्यात गडावरच्या इमारती न्हाऊन निघतील. पौर्णिमेला सागराला जशी भरती येते तशी ह्या इमारतींमधील चिऱ्याचिऱ्याला शिवप्रेमाची भरती येईल आणि त्यातून रायगडाची सुखदु:खे पाझरू लागतील. त्यातून ही पौर्णिमा त्यांच्या दृष्टीने खूपच दु:खाची. त्यांचा कर्ता-करविता शिवकल्याण राजा त्यांना त्याच दिवशी सोडून कायमचा निघून गेलेला. त्यामुळे रात्रभर त्यांच्याशी हितगुज करीत गडभर हिंडायचं. सगळ्यात शेवटी महाराजांच्या समाधीसमोर जाऊन हात जोडून उभे राहायचे आणि प्रार्थना करायची, **'तव शौर्याचा एक अंश दे। तव धैर्याचा जरा स्पर्श दे । तव तेजातील एक किरण दे । जीवनातला एकच क्षण दे'** त्या यशवंत कीर्तिवंत राजाचे रूप, पराक्रम मनात साठवायचा. त्यांच्या अनेक गुणांपैकी एकतरी गुण आपण आपल्या जीवनांत निश्चित आचरून दाखवू अशी प्रतिज्ञा करायची आणि परत फिरायचे.

मग पुढील वर्षी येणार ना रायगडावर? पण त्यासाठी तुम्ही आम्हाला कळवायला विसरू नका. शिवाजीमहाराजांचा इतिहास आपण वाचतो, त्यांचे पोवाडे आपण गातो कारण त्यांच्यासारखा महापुरुष होत नाही असे म्हणून आपण गप्प बसतो. एका काव्यात म्हटले आहे कारण स्वत: रामदासांनी शिवाजी महाराजांविषयी लिहितांना म्हटलं की, 'त्या भूमंडळाचे ठायी धर्मरक्षी ऐसा नाही' अशा या धर्मरक्षकाविषयी, जाणत्या राजाविषयी पुढील वर्षापासून एक नवीन लेखमाला सुरू करीत आहोत. 'शिवकल्याणराजा'. **

**जरा डोके चालवा!**



त्रिकोणांची संख्या ओळखा

– विनय चुटके, १२ वी पुणे



नवनिर्मितीचा आनंद फक्त काव्य निर्मिती व साहित्य निर्मितीतच असतो असे नाही. साध्या कागदापासून आकर्षक त्रिमितरचना करताना येणारी धमाल, एखाद्या इमारतीची हुबेहुब प्रतिकृती तयार करताना रमणारे मन अन् सुंदर प्रतिकृती तयार झाल्यावर सर्व बाजूंनी न्याहाळताना होणारा आनंद काही विलक्षणच असतो. गेल्याच वर्षी आम्ही दोघांनी हा आनंद अनुभवला.

१० वी च्या सुट्टीमध्ये ही सुट्टी वेगळ्या पद्धतीने कशी वापरता येईल असा विचार सुरू झाला अन् मग ठरलं की ज्ञान प्रबोधिनीच्या पुण्याच्या वास्तूची प्रतिकृती तयार करायची. काम तसं अवघड होतं. प्रथम सर्व बाजूंनी वास्तूचे निरीक्षण केले. त्याचे कच्चे चित्र वहीत काढले. इमारतीची प्रतिकृती प्रमाणात होणे फारच गरजेचे असणार होते. म्हणून मग इमारतीचे आराखडे बघितले. काही अंतरे पावलांनी मोजून त्याप्रमाणे प्रमाण निश्चित केले व टप्प्याटप्प्याने काही वास्तूची प्रतिकृती ३ आठवड्यात पूर्ण केली. आमच्या कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून आम्ही ही प्रतिकृती शाळेला भेट म्हणून दिली. आम्हाला विशेष आनंद होतो की ह्याच प्रतिकृतीला माननीय संचालकांच्या खोलीत विराजमान होण्याचा मान मिळाला.

तुम्हासही अशा विविध इमारतींच्या प्रतिकृती बनवायला निश्चितच आवडेल पण एकदम प्रतिकृती करायला गेलात तर भलताच वेडावाकडा सांगाडा तयार व्हायचा आणि मग आपला प्रारंभी काही सोपेसापे भौमितिक प्रतिकृतीचे प्रकार कसे करायचे ते समजावून घेऊ.

१) त्रिकोणाकार – आकृतीत दाखविल्याप्रमाणे मापे घेऊन आकृती

कार्डशीटवर काढून घ्या. अखंड रेषांवरून आकृती मुख्य कागदापासून स्वतंत्र कापून घ्या. तुटक रेषांवरून एक दोनदा कर्कटक फिरवा व तेथे कागदांना घड्या पाडा. आता चिकटपट्यांना फेविकॉल लावून पट्ट्या अलगदपणे आतल्या बाजूंनी चिकटवा हा झाला तुमचा त्रिकोणाकार (प्रिझम).

आता या प्रतिकृतीमध्ये लांबी (×) बदलून विविध प्रकारचे छोटे मोठे त्रिकोणाकार तयार करू शकाल. मग त्यातून त्रिकोणाकार डबी तयार होईल. एखादा मनोरा तयार होईल. असे वेगवेगळ्या आकारांचे त्रिकोणाकार तयार करा.

**प्रतिकृती चांगली झाली हे कसे ओळखणार?**

कोणत्याही दोन समोरासमोरील रेषा एकमेकांना समांतर असल्या पाहिजेत. तसेच कोणतीही एक बाजू ही एकाच प्रतलात असायला हवी ती वेडीवाकडी होता कामा नये. चिकटपट्टीचा भाग बाहेरून दिसता कामा नये व कागदाचा पांढरेपणा कागद हाताळून, फेविकॉल इ. च्या वापराने कमी होता कामा नये. सर्व कडा धारदार असायला हव्यात अन सर्व शिरोबिंदू टोकदार असायला हवे..

आता या त्रिकोणाकाराच्या ऐवजी कडेच्या दोन्ही बाजूंना त्रिकोणाऐवजी चौरस काढा अन् मधे तीन ऐवजी चार बाजू घ्या.

खालील आकृतीत दाखविल्याप्रमाणे तुम्ही चौरसाकार, षटकोणाकार करू शकाल. चौरसामध्ये अ, ब व क यांची मापे बदलून विविध आकाराचे आयताकार आपण करू शकाल. त्रिकोणाकाराप्रमाणेच षटकोणाकाराचीही उंची कमी जास्त करून त्याची डबी, डबा किंवा अन्यही प्रतिकृती तयार

(पान २४ वर पुढे चालू)







एकांकिका

# विषय गेले पळून

– श्री. संजय पवार, पुणे

पडदा उघडतो तेव्हा रंगमंच पूर्ण काळोखात. हळूहळू सायरनचे आवाज येतात दूरून जवळ येऊन लांब गेल्यासारखे. आता रंगमंचाच्या कोपऱ्यात अथवा मध्यभागी पुढे अथवा मागे स्वच्छ निळसर प्रकाशात एक दूरदर्शन निवेदिका येते.

निवेदिका – सर्व नागरिकांसाठी एक आवाहन, काल रात्री शहराच्या प्रमुख शाळेतून अभ्यासाचे काही विषय वेळापत्रकाचे गज वाकवून फरार झाले आहेत. पोलिस महानिरीक्षकांनी दिलेल्या माहितीनुसार शाळेच्या वेळापत्रकातले नऊ विषय वेळापत्रकाचे गज वाकवून पळाले होते पैकी भाषेच्या विषयांना २४ तासाच्या आत अटक करण्यात पोलिसांना यश आले असून सततचा पाठलागा नंतर पीटीचा तास मुंबई–पुणे महामार्गावर पोलिसांच्या हाती आला. मात्र इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र या विषयांचा मात्र अद्याप तपास लागला नसून, पोलिसांनी संपूर्ण शहराची नाकेबंदी केली आहे. दरम्यान लवकरच सर्व विषय वेळापत्रकात परत आणण्यात शासन व पोलिस यशस्वी होतील असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले आहे. विशेष निवेदन संपले.

(आता रंगमंच्याच्या एका भागातून लपत छपत तिघं जण येतात. हेच ते इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र. इतिहासाच्या अंगावर एखाद्या रोमन राजासारखी राजवस्त्रं आहेत. भूगोलाच्या सदऱ्यावर सर्वत्र नकाशे आहेत तर नागरिकशास्त्राच्या अंगावर पट्ट्यांच्या अथवा चौकटींचा शर्ट. तिघंही दमून एके ठिकाणी थांबतात.)

**इतिहास –** बस्स! आता जरा थांबूया

**भूगोल –** (स्वत:च्या शर्टावरच्या नकाशात बघत) हो काहीच हरकत नाही. इथून मनुष्यवस्ती फार जवळ नाही.

**नागरिकशास्त्र –** पण आपण हे असं किती दिवस पळत रहायचं चोरासारखं?

**इतिहास –** ती ही एक गंमतच आहे. दैदिप्यमान, गौरवशाली वगैरे असलेला मी इतिहास – आज हा असा चोर, फरार म्हणून हिंडतोय् !

**भूगोल –** आणि सर्व जगावर ज्याचे अक्षांश, रेखांश आहेत तो मी भूगोल. आता स्वत:च गोल फिरत, फरार चोर ठरलोय!

**नागरिकशास्त्र –** केवळ तुम्हीच नव्हे तर

मी ही कुठलाही शास्त्र नसलेला एक फरार नागरिक ठरलोय.

**नागरिकशास्त्र –** मग? काय करायचं ठरलं

**इतिहास –** काही नाही. माघार तर निश्चित नाही.

**भूगोल –** आपण नवाच प्रदेश तयार करू.

**नागरिकशास्त्र –** पण आपल्याला हे झेपणार का?

**इतिहास –** कुणाशी बोलतोस तू! इतक्या लढावू वृत्तीच्या आमच्याबद्दल शंका?

**भूगोल –** आणि मला कुठलाही प्रदेश सहज साध्य!

**नागरिकशास्त्र –** पण माझं काय?

**इतिहास –** यू ब्लडी सिव्हिलियन्स! तुम्हाला अक्कलच नाही याने आखलेला भूगोलावर आणि मी सांगितलेल्या इतिहासावर तुमची इमारत उभी राहणार पण तुम्ही तर माजलात. तुम्हाला इतिहासच बदलायचाय आणि भूगोलाची माती करायचीय. आता नागरिक नाहीतच राक्षस जन्मताहेत, वाढताहेत. (पार्श्वभूमी घनश्याम सुंदरा ही भूपाळी सुरू होते. त्यातल्या शब्दानुरूप उठण्याची, पाणी भरण्याची, दळण्याची शेतावर जाण्याची कंपोझिशन्स हालचाली व शास्त्रीय नृत्याद्वारे. गाणं संपताच ते तिघं पुन:)

**भूगोल –** किती छान दृश्य होतं. डोंगर, दऱ्या, नदी, नाले, उन पाऊस या सगळ्यांनाच एक अस्तित्व होतं पण माणसाची भूक वाढली. त्याने ही चक्रच उलट सुलट करून टाकली. तो ऋतू बदलू लागला, डोंगर पोखरू लागला, झाड तोडू लागला, तो माझ्या जीवावरच उठला आता नवीन जग. (हे सगळं जग विविध जाहिरातींच्याद्वारे रंगमंचावर यावं त्यातून धावपळीच व कुठल्याही त्रासावर उपाय



असल्याचं सूचित व्हावं उदा. गरम होतयं अमूक पंखा घ्या. थंडी वाजतेय हिटर घ्या. प्लास्टिकची फूलं कृत्रिम श्वासोच्छवास इ.इ पुन: ते तिघं.)

**इतिहास :** चुटकी वाजवताच स्वर्गही तयार अशा स्पर्धेत ह माणूस राक्षसच होत गेलाय.

**भूगोल :** जाती, धर्म, वंश, राष्ट्र यांच्या विद्वेषात तो स्वत: निर्माण केलेल्या सृष्टीबरोबर माझी सृष्टीही बिघडवू लागला. आठवतं तुला -- तुझ्या लहानपणी तुझी आई कशी छान गोष्ट सांगायची..

(गोष्ट साकारते)

आई व छोटं मूल .. (चिमणी/कावळा)

**कावळा :** चिऊताई, चिऊताई दार उघड

**चिऊ :** थांब मी माझ्या बाळाला आंघोळ घालते.

**कावळा :** चिऊताई, चिऊताई दार उघड.

**चिऊ :** थांब मी माझ्या बाळाला तीट लावते.

**इतिहास :** आणि आजची गोष्ट बघायचीय?

**कावळा :** चिऊताई, चिऊताई दार उघड.

**चिऊ :** थांब, मी माझ्या बाळाला हेल्मेट घालते.

**कावळा :** चिऊताई, चिऊताई दार उघड

**चिऊ :** थांब मी माझ्या बाळाला बुलेटप्रूफ जाकीट घालते.

**इतिहास :** सांग, सांग याला 'माणूस' म्हणायचा?

**भूगोल :** जो स्वत:बरोबर चराचर सृष्टीलाही विज्ञानाकडे घेऊन चाललाय.

**नागरिकशास्त्र :** पण . . . मी काय करणार?

**इतिहास :** तू नागरिक शास्त्र नं! तू तर त्यांना घडवायला हवं!

**नागरिकशास्त्र :** कसं घडवणार? मला कोण विचारतो? शाळेतलं शेंबडं पोर ही विचारत नाही. १० मार्काला कुणी हिंग लावून विचारत नाही म्हणून तर पळालो ना तुमच्या सोबत. सगळं करून पाहिलं तरी हा माणूस छान, प्रमाणिक नागरिक व्हायला तयारच नाही.

**इतिहास :** अरे .. तो पहा ..

**ना. शास्त्र, भूगोल :** हा इथे कसा काय?

**भूगोल :** या नो मॅन्स लॅन्डचा पत्ता याला कसा लागला?

**इतिहास :** याला भूलवला, गुलवला तरी पाहिजे नाहीतर हाकलला तरी पाहिजे.

**भूगोल :** अरे हा तर फारच

(एवढ्यात रंगमंचावर शाळकरी दहावीतला वगैरे मुलगा येतो. या तिघांना पाहून तो चकीत होतो. हातातला कागद व आजूबाजूला निरखून पाहात)

**मुलगा :** खाणाखुणातर बरोबर आहेत. मग

या नो मॅन्स लॅन्डवर हे तीन मॅन कोण? लेट अस आस्क देम

**इतिहास :** कोण आहेस तू?

**भूगोल :** कुठून आलास?

**नागरिकशास्त्र :** आणि इथे काय करतोस?

**मुलगा :** प्रथम तुम्ही कोण आहात, कुठून आलात व इथं काय करताहात ते सांगा?

**इतिहास :** बघा, बघा ही तुमची नवी पिढी. बुजुर्गांसमोर कशी तोंड वर करून बोलतेय.

**नागरिकशास्त्र :** काय रे शाळेत तुला काही शिकवलं की नाही.

**मुलगा :** शिकवायचे विषयच पळाल्याने शाळा सध्या बंद आहे. (तिघे चपापतात) ... आणि विषय पळाले नसते तरी मी पळालो असतोच.

**भूगोल :** म्हणजे?

**मुलगा :** मला शाळेचा कंटाळा आला होता.

**नागरिकशास्त्र :** का?

**मुलगा :** तिथे मला नवं काहीच शिकायला मिळत नव्हतं. जो धडा माझा दादा शिकला तोच मी शिकलो. जे गणित आमच्या ताईनं सोडवलं तेच मी सोडवलं. मग मी एकदा गुरुजींना म्हटलं. यासाठी फी भरून शाळेत का येऊ? घरीच शिकतो की, असं म्हटले तर हाकलून दिलं मला घरी!

(आता तिघे त्याच्या जवळ येतात)

**मुलगा :** घरच्यांनी रिबॉन्ड मारावा तसं पुन: शाळेत धाडलं!

**नागरिकशास्त्र :** नंतर नीट झालं असेल सारं.

**मुलगा :** अजिबात नाही.

**भूगोल :** का?

**मुलगा :** दुसऱ्या दिवशी वर्गात गेलो तर गुरुजींनी विचारलं, 'पृथ्वी गोल आहे हे कशावरून सिद्ध होतं ते सांग. मी म्हणालो, 'आलटून पालटून त्याच त्या प्रश्नपत्रिका येतात त्यावरून ! पुन: रिबॉन्ड – या वेळी घराच्या दिशेने. पण तुम्ही हे –

**इतिहास :** आम्हीच ते पळालेले इतिहास, भूगोल, नागरिकास्त्र

**मुलगा :** तुम्ही ! तुम्हाला शोधून काढायला लाखांचं बक्षीस जाहीर झालंय.

**नागरिकशास्त्र :** त्यासाठी तू इथवर आला आहेस?

**मुलगा :** छे! मला खूप दिवसापास्नं ही नो मॅन्स लँन्ड पाहायची होती. विषय पळाल्याने शाळांना सुट्ट्या आहेत. तेव्हा थेट निघालो.

**इतिहास :** कुणालाही न सांगता.

**मुलगा :** हो.

**भूगोल :** शाळेत नकाशावर पाहिली नाहीस ही लॅन्ड.

**मुलगा :** नाही. गुरुजींना एकदा विचारलं ते म्हणाले पोर्शनमध्ये नाही. मी म्हटले पण

नकाशावर असेन ना? तर म्हणाले जे पोर्शनमध्ये नाही ते नकाशावर काय, जगात असलं तरी दाखवणार नाही. अवांतर वाचून गोंधळ होतो.

**नागरिकशास्त्र :** असं गुरुजी म्हणाले?

**मुलगा :** होय! तुम्हाला माहितीय. केवळ ऐतिहासिक नाटकात पूर्वी काम करायचे म्हणून एकजण इतिहास शिकवतात व भूगोल शिकविणारे मास्तर रत्नागिरी सोडून कुठेही गेलेले नाहीत! त्यामुळे तुम्ही पळालात हे योग्यच झालं

**नागरिकशास्त्र :** पण मग आता शाळा बंद आहेत तर मुलं काय करतात.

**मुलगा :** व्हिडियो पाहातात! परवाच स्मगल्ड कॅसेट आल्यात मार्केटमध्ये वॉरच्या लेटेस्ट वॉरच्या !

**इतिहास :** मग तुला नाही वाटत त्या बघाव्याशा...

**मुलगा :** नाही .... मला नाही आवडत ... का कोण जाणे पण माझ्या स्वप्नात वेगळंच काही येतं .. घरचे म्हणतात हे कार्ट अकाली प्रौढ झालंय... आई म्हणजे सायकियाट्रीसकडे न्यायला हवं. शाळेत म्हणतात.. याच्यावर फार खर्च करू नका... किंवा मतिमंदांच्या शाळेत घाला... (तो तोंड लपवतो. हे तिघं त्याला धरतात) ... मला हवं ते मिळेल? मिळेल. (त्याचे स्वप्न दृश्य सुरू होतं)

मी तान्हा या सृष्टिचा
मी पान्हा या तान्ह्याचा
मी रांगेन या हिरव्या कुरणांवर बुलेट अन मशिनगन्सचा मारा टाळून जिथे फक्त शिळच येईल छानशी कानावर
अंड्यातून कोवळा पिवळा जीव यावा सूर्य डोंगराआडून यावा मखमली बटव्यात खडीसाखर ठेवावी तशी रात्र चांदण्यांनी भरून जावी. अरे लागेल गोळी म्हणून छाताड झाकशील पण छिन्नविच्छिन्न आभाळ कसे सांभाळशील?
प्रदूषित रक्तवाहिन्या रुग्णालयात वाळवशील
पण जमिनीतले झरे कुठल्या बेडवर ठेवशील? मी सांगेन हक्क हिरव्या कुरणांवर मला नकोत वारसे रणांगणावर मी सांगेन हक्क नव्या भविष्यावर
मी पाळेन सृष्टिचे शास्त्र
जे रुजले आहे मूळासारखे खोलवर आणि पसरले आहे फांद्यांसारखे आभाळभर
हे देण्या-घेण्याचे मायेचं शास्त्र
मला 'नागरिक' करून शिकवेल कसं करावं प्रेम एकमेकांवर
मी पान्हा या सृष्टिचा
ती तान्हा या तान्ह्याचा
(या कवितादरम्यान पुन: एकदा छान


असे घटते सुंदर अक्षर -अशोक शंकरराव ताकमोगे

Aa Bb Cc Dd Ee Ff Gg Hh Ii Jj

Kk Ll Mm Nn Oo Pp Qq Rr Ss Tt

Uu Vv Ww Xx Yy Zz 1 2 3 4 5 6 7 8

9 0 . ? ! ; , “ ” : ’ ace and beg jar pan

rat sun bed leg pig pin six nib ask bye

god hut ice now owl see box yes you dam

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| zoo | x-ray | rank | mace | cave | save | same | safe |
| bake | sale | pale | tape | date | gate | rate | bell |
| bend | desk | nest | sell | send | step | test | rest |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| apple | zebra | eight | ruler | sheep | socks |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| pencil | ribbon | pebble | school | doctor |

| | | | |
|---|---|---|---|
| jasmine | morning | feather | balloon |
| trousers | question | football | umbrella |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Kedar | Hari | Yusuf | Deepa | Eknath | |
| Kisan | Seema | Gopal | Meena | Farida | |
| Viju | Anjali | Shyam | Raju | Upendra | |
| Farukh | Vaishali | Rajiv | Radha | Leela | |
| Mathematics | Geography | November | | | |
| Maharashtra | England | Aurangabad | | | |
| March | April | May | June | July | Friday |

1 "I am What," What shouted.

"Thank you," he said. "What's your name?"

2 This is my father. He is a baker.

This is my mother. Her name is Ayesha. This is my sister, Farida.

She is a small girl. And this is me in the picture.

3 Good handwriting is a sign of healthy mind. – Mahatma Gandhi.

संतुलित जीवनाचं दर्शन घडतं. विविध कंपोझिशन, आलाप, पदन्यास यांनी सृष्टी साकारते.)

**इतिहास :** हा असा भूगोल असेल तर

**भूगोल :** त्याचा इतिहास गौरवशालीच राहील

**नागरिकशास्त्र :** आणि त्याचा पाईक होणं मला आवडेल.

**तिघं :** हे असं चित्र असेल तर वेळापत्रकाचे गज आम्ही पुन्हा हारासारखे गळ्यात मिरवू आम्ही खरं सांग मुला तुला खरंच असं चित्र हवंसं वाटतं तुला खरंच असा धडा शिकावासा वाटेल?

खरं सांग मुला, खरं सांग

(तिघं मुलाच्या पायाशी येतात. मुलगा त्यांच्याकडे पाहातो त्यांचा हात धरून त्यांना नेऊ लागतो तेव्हा पार्श्वभागी सूचक, आश्वासक गीत, संगीत, नृत्य चित्र) **

---

# गुढीपाडवा

**कु. आरती देशपांडे, पणदरे, जि. पुणे**

**''विजय पताका श्रीरामाची**
**झळकते अंबरी,**
**प्रभु आले मंदिरी**
**आले प्रभु आले मंदिरी''**

साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी या एका मानाच्या दिवशीच प्रभू रामचंद्र चौदा वर्षाचा वनवास संपवून परत अयोध्येत आले. गुढी पाडव्याला घरावर गुढी उभारतात ती याच विजयाची प्रताप पताका. ब्रम्हदेवाने सृष्टी निर्माण केली ती याच दिवशी. पंचांगानुसार या दिवशी नव्या वर्षाला सुरुवात होते. पैठणच्या शालिवाहन राजाने आपल्या नावाने जो 'शक' सुरू केला त्याची सुरुवात याच दिवशी झाली. चैत्र महिन्याचा हा पहिला दिवस.

गुढी पाडवा हा अतिशय शुभ आणि मंगल दिवस मानला जातो. त्यामुळे कोणत्याही शुभ कार्याची सुरुवात या दिवशी करतात किंवा घरात एखादी नवीन वस्तू खरेदी करावयाची असेल तर ''आत्ता नको बाई पाडव्यालाच खरेदी करू'' असे संवाद कानी पडतात. मिष्टान्नाबरोबर कडुलिंब खाण्याची प्रथा किती बोलकी आहे नाही का?

वर्षारंभीच आपण सुखांबरोबर मनाची तयारी करतो.

शिशिराच्या जीवघेण्या थंडीने गारठून गेलेली सृष्टी देखील अंग झटकून वसंत ऋतुतील गुढीपाडव्याचे स्वागत करण्यासाठी सज्ज असते. आपापसातील कटुता विसरायला लावून सर्वांना एकत्र आणणारा असा हा सण धर्म, जाती, देश यांच्या मर्यादा पार ओलांडून जातो. स्निग्धता आणि स्नेह यांनी माणसा-माणसात रेशमाचे बंध जोडणारा व म्हणूनच इतर परंपरागत सणांपेक्षा हा एक वेगळा सण आहे.

***

# गोष्ट लिहून पाहा



डॉ. अशोक निरफराके

गोष्टी लिहिणाऱ्या लेखकांना त्या सुचतात तरी कशा? गोष्टीतली माणसं त्यांना कुठे भेटतात? गोष्टीतले प्रसंग खरोखरच त्यांच्या आयुष्यात घडलेले असतात का? असे प्रश्न कधी तुमच्या मनात आले आहेत का?

पण मग प्राण्यांच्या गोष्टीचं काय? पशुपक्षी तर काही बोलत नाहीत किंवा बोलत असले तरी त्यांचे बोलणे आपल्याला समजत नाही. मग लहान मुलांना आवडणाऱ्या पशुपक्ष्यांच्या गोष्टी लेखकांना कशा काय सुचतात?

याचे उत्तर आहे– कल्पनाशक्ती! अशा कल्पनाशक्ती लढवून आज आपण एक गोष्ट लिहून पाहाणार आहोत.

पुढे दिलेल्यांमध्ये तुम्हाला काही सामायिक बाब किंवा सारखेपणा आढळतो का?

१) गणपती २) नरसिंह ३) मत्स्यकन्या
४) स्फींक्स ५) तुंबरू

थोडा विचार केल्यावर तुमच्या लक्षात येईल की यातील कुणीही निसर्गात प्रत्यक्ष आढळत नाही आणि ते सगळे दोन वेगवेगळ्या प्राण्यांच्या मिश्रणातून तयार झालेले आहेत. गणपतीला शरीर माणसाचे तर डोके हत्तीचे, नरसिंहाला डोके व हात सिंहाचे तर उरलेले शरीर माणसाचे. इजिप्तमधल्या स्फिंक्सला डोके माणसाचे तर शरीर सिंहाचे मत्स्यकन्येला कमरेच्या वरचे शरीर मुलीचे तर उरलेले शरीर माशाचे. पुराणातल्या तुंबरुचे डोके घोड्याचे तर शरीर माणसाचे. या जगावेगळ्या प्राण्यांची किंवा देवतांची निर्मिती केली पुराणकथा लिहिणाऱ्या लेखकांच्या कल्पनाशक्तीने.

मग आपण सुद्धा असे नवे प्राणी निर्माण करायला काय हरकत आहे? त्यासाठी पुढे विचार करा.

१) वेगवेगळे पशु, पक्षी, कीटक, पाण्यातले प्राणी डोळ्यासमोर आणा. त्यातले तीन किंवा चार निवडा. निवडताना सगळे एकाच गटातले (म्हणजेच जंगली पशु किंवा सगळेच पक्षी इत्यादि) असे निवडू नका. निवडलेल्या प्राण्यातच वेगवेगळे अवयव किंवा शरीराचे भाग एकमेकांना जोडून कोणत्या प्रकारच्या विचित्र विचित्र प्राणी तयार होऊ शकेल अशी कल्पना करा. ती कागदावर लिहा.

२) तुमच्या या काल्पनिक प्राण्याचे चित्र काढा. ज्यांची चित्रकला चांगली नसेल त्यांनी सुद्धा कच्चे का होईना पण चित्र काढावेच. म्हणजे त्या कल्पनेतल्या प्राण्याला दृश्य रूप येईल आणि तो तुमच्या नजरेसमोर बागडू लागेल.

३) आता या अभिनव प्राण्याचे नाव काय ठेवायचे? पुन्हा तुम्ही मिश्रणाची युक्तीच वापरू शकाल. म्हणजे तुम्ही निवडलेल्या पशुपक्ष्यांच्या नावातले एक एक अक्षर घेऊन त्या अक्षरांच्या मिश्रणातून हे नाव तयार करता येईल. उदा. 'वागमा'नावाचा प्राणी तयार झाला आहे. वाघाचे डोळे गरुडाचे पंख आणि माणसाचे शरीर एकमेकांना जोडून!

४) तुमचा हा प्राणी कसा काय जन्माला आला? गणपतीच्या किंवा नरसिंहाच्या जन्माच्या गोष्टी तुम्हाला माहीत आहेत. खारीच्या पाठीवर पट्टे कसे आले. वगैरे सारख्या गोष्टीही तुम्ही वाचल्या असतील. अशा गोष्टी आठवून पाहा. म्हणजे तुम्हालाही वेगवेगळ्या कल्पना सुचू लागतील. त्यातल्या सगळ्यात आकर्षक कल्पना निवडा आणि तिचा वापर करून एक छोटीशी गोष्ट लिहा.

५) आता अशी कल्पना करा की तुमचा हा काल्पनिक प्राणी जंगलात गेला तर काय काय होईल? त्याला अडचणी काय येतील? त्याच्या विचित्र शरीराचे त्याला काही फायदे होतील की तोटे होतील? कोणते प्राणी त्याचे शत्रू होतील, या बाबतच्या कल्पना वापरून मूळच्या गोष्टीत भर घाला.

६) समजा, तुमचा तो प्राणी तुमच्या गावात आला किंवा शाळेत आला तर काय काय होईल? यावर कल्पना करून तुमची गोष्ट आणखी खुलवा.

काल्पनिक प्राण्याच्या रंगवलेल्या चित्रासहित तुमच्या गोष्टी आमच्याकडे पाठवा. मिश्रण करण्यासाठी हजारो पशु, पक्षी, कीटक तुम्हाला उपलब्ध आहेत. प्रत्येक जण त्यातील कोणतेही तीन चार निवडणार म्हणजे प्रत्येकाचा प्राणी वेगळा होऊ शकेल. अशा हजारो नवीन प्राण्यांच्या कल्पना करणे शक्य आहे. या प्राण्यांच्या जन्मासाठीसुद्धा देव, राक्षस, चेटक्या इत्यादिंपासून अपघात आणि शास्त्रीय संशोधन येथपर्यंत शेकडो कल्पना तुम्हाला सुचू शकतील बसा तर मग चित्र काढायला आणि लिहायला.

तुमच्या वर्गातल्या किंवा दलावरच्या मुलामुलींनी अशा सचित्र गोष्टी लिहिल्या तर त्या एकत्र करून 'विचित्र प्राणि-संग्रहालय' असा सामुदायिक प्रकल्प सुद्धा तुम्ही करू शकला किंवा मोठ्या कागदावर चित्रे काढून त्यांचे प्रदर्शनही भरवू शकाल.

**'माझी शाळा'**

**ज्ञान मिळविण्या उच्च प्रतीचे दारी तव आलो**
**नम्र होऊनी सदा पदाशी लीन आम्ही झालो**
**प्रकाश मिळूनी विज्ञानाचा जीवन उज्ज्वल**
**करू बोध घेऊन सत्कार्याचा जन सेवा आचरू**
**धि:कारूनीया अंधकल्पना नूतन जग पाहू**
**नीटनेटके राहून प्रेमळ प्रसन्नता ही धरू.**

**कौस्तुभ समुद्र,**
६वी, ज्ञानप्रबोधिनी, पुणे

**(करून तर पाहा** पान ११ वरून पुढे) करता येतील. या आकारांचा वापर करून छोटेसे घर खोलीच्या आतल्या सजावटीची प्रतिकृती तुम्हालाही करून पाहता येतील.

पुढील अंकात मनोरे कसे करावेत व त्यातील वैविध्य वापरून नवनवीन भौमितिक प्रतिकृती कशा तयार करता येतील ते पाहूयात पण तोपर्यंत यात सुचविलेल्या गोष्टी तुम्ही करून पाहा अन् सुट्टी आनंदात व नवीन काहीतरी करून बघण्यात घालवाल अशी खात्री वाटते.

आपल्याला हे करायला लागेल फक्त कात्री, कार्डशीट, फेविकॉल, कर्कटक, कंपासपेटी, थोडीशी एकाग्रता, नीटनेटकेपणा अन् प्रतिकृती करण्याची इच्छा!

---

# 'जीवन'

जीवन आहे चढ – उतार
मानू नको तू हार
यशाच्या पायऱ्या चढत रहा
स्वागत करील हा काळ
मागे वळून बघू नको
आहे मागे अंधकार
पुढे पुढे चालत रहा
आहे पुढे प्रकाश

**कु. ज्योती हडदरे, हडपसर, पुणे**

# निकाल स्पर्धांचे

चित्रकला स्पर्धा
निकाल

सुमारे ७५ जणांनी चित्र काढून पाठविली होती. अनेक चित्रे चांगली होती. त्यातील विद्यार्थ्यांना बक्षिसं देण्यात येत आहेत.

१) प्रथम क्रमांक – **रंजना कजरोट्टी**
९ वी, सिद्धेश्वर कन्या शाळा, सोलापूर

२) द्वितीय क्रमांक – **किरण दि चौधरी**
८ वी, न्यूसिटी हायस्कूल, धुळे

३) तृतीय क्रमांक – **समीर गर्दे**
८ वी, सुयश विद्यालय, सोलापूर

**यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन!**

*त्यांना जाहीर केलेल्या रकमेची पुस्तके लवकरच पाठविण्यात येतील.*

---

**हसा ऽ हसा ऽऽ हसा ऽऽऽ**

एका वेड्याच्या इस्पितळात दोन वेडे गप्पा मारत असतात एक वेडा दुसऱ्या वेड्याला म्हणतो, 'सूर्य अगदी मूर्ख आहे, त्याचा आपल्याला काही उपयोग होत नाही कारण जेव्हा दिवसा इतका उजेड असतो तेव्हा तो उगवतो आणि रात्री इतका काळोख असूनही उगवत नाही.'

# नेफा – एक अविस्मरणीय नामुष्की – २

– प्रा. अनघा लवळेकर

आसाम! भारताच्या उत्तर पूर्वी प्रदेशातील एक महत्त्वाचे राज्य. घनदाट जंगले, ब्रम्हपुत्रेचा रोंरावणारा प्रवास, नैसर्गिक तेलखाणी आणि लढाऊ आदिवासींची वस्ती असलेला! आसामच्या उत्तरेचा भाग म्हणजेच दुर्गम पहाडांनी बनलेला NEFA!

नेफातील युद्धाची पहिली फेरी चिनी सैन्याने संपविली. नंतरची शांतता ही वादळापूर्वीची शांतता होती. एकीकडे चीनचे चढाईचे plans बनत होते तर दुसरीकडे त्या दृष्टीने सैन्याच्या हालचाली होत होत्या. सीमेवर बुमला ते तावांग असा पक्का रस्ता बांधण्याची सुरुवात झालीच होती. याची योजना व तयारी त्यांनी इतकी सज्ज केली होती की अवघ्या पंधरवड्यात त्यांनी हा सुमारे पंचवीस मैलाचा रस्ता या गगनचुंबी पहाडात बांधून काढला. या सर्वांची खबरबात भारतीय सैन्याला होती पण एक गोष्ट मात्र चिन्यांनी अगदी गुपचूप केली ती म्हणजे 'सेला' खिंडीच्या पूर्व पश्चिमेस असलेल्या खिंडीत त्यांनी टेहळणी पथके पाठवून नीट पाहाणी केली.

खरे तर रस्ता बांधणे चालू असता आपल्या विमानदलाला तेथे बॉम्ब टाकून घबराट उडविणे व रस्ता नाकाम करणे शक्य होते पण प्रत्युत्तर म्हणून चिन्यांनी आसामातल्या तेलखाणीवर बॉम्ब टाकले तर? या भीतीने सरकार स्वस्थ बसले.

चीनचा दुसरा निर्णायक हल्ला झाला तो 'वालाँग' वर! मिथून व लॅडर्स भागात 'सतत चकमकी सुरू ठवेनू भारतीय फौजांना त्यांनी अडवणूक ठेवले. चार नोव्हेंबरलाया ठाण्याच्या पश्चिमेकडील 'यलो पिंपल'' व 'ग्रीन पिंपल' पहाडांवर चिनी सैन्याची हालचाल चालू असल्याचे 'मिथुन' वरील शीख रेजिमेंटने हेरले. आश्चर्य म्हणजे हे या भागातील सर्वांत उंच पहाड असूनही आपली ठाणी तेथे नव्हती. साहजिकच चिन्यांना तेथून हुसकावणे आवश्यक होते. ६ नोव्हेंबरच्या हल्ल्यात आपल्या 'कुमाऊँ' पथकाला चिन्यांच्या तुफानी गोळीबारमुळे माघार घयावी लागली. १४ नोव्हेंबरच्या हल्ल्यात पहाडाच्या अगदी माथ्याजवळ भारतीय जवान पोचले होते. परंतु पाठीमागच्या 'आशी' टेकड्यावरून चीनला पुरविलेल्या दारुगोळ्याच्या मानाने आपली रसद कमी पडली. दोनशे पैकी नव्वद जवानच तळावर परतले पण चिन्यांची भरपूर हानी करूनच.

'यलो पिंपलहून माघार घेणाऱ्या पथकापाठोपाठच चिनी सैन्य आगेकूच करून वॉलाँगच्या दिशेने येऊ लागले. मिथून लँडर्स च्या पथकांनीही भरपूर शौर्याने

प्रतिकार केला पण त्यांनाही मागे हटावे लागले. ही ठाणी गेल्यावर मात्र भारतीय सैन्याची या भागात सगळीकडे पीछेहाट सुरू झाली. 'माघार' वा 'प्रतिकार' असा कोणताच स्पष्ट आदेश सेनाधिकाऱ्यांकडून न मिळाल्याने सैन्यात काहीसे गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. आपली आघाडीची ठाणी स्वतंत्रपणे शौर्याने लढली तरी त्याची सुसूत्रता नव्हती आणि त्यात वाटेत जागोजाग चिन्यांनी उभारलेले अडथळे! त्यामुळे संघटित लढा कुठेच दिला गेला नाही.

मेचुका, लाग्जू भागात आपली स्थिती खरं तर मजबूत होती. पुरवठा मार्ग चांगले होते. चिन्यांची संख्या कमी होती पण वालाँगमधील पीछेहाटीच्या धक्क्याने संरक्षणमंत्री आणि सेनाधिकारी गोंधळले आणि त्यांनी नेफातील सर्वच पथकांना माघारीचे संदेश पाठविले.

ही स्थिती चीनने अचूक हेरली आणि मेचुकाला वळसा घालून त्यांनी मधल्याच प्रदेशात अडथळे उभारले. आपल्या सैनिकांचा परतीचा मार्ग अडविण्याचा त्यांचा बेत होता यामुळे गुरखा बटॅलियनच्या शूर जवानांना नाहक बर्फवादळात आपले प्राण गमवावे लागले.

आता चीनचे लक्ष्य होते 'सेना-बोमदिला'. हा भाग जिंकला की आसामच्या पठारावर येण्याकरता कोणताच नैसर्गिक अडथळा नव्हता. एकदा का चिनी सैन्य पठारी भागात घुसले असते तर तेथून त्यांना हुसकावणे फारच अवघड व गुंतागुंतीचे बनले असते. १७ नोव्हेंबरला चीनी सैन्य सेलावर थेट चालून आले पण तत्पूर्वीच पश्चिमेच्या 'बांगझोग' व पूर्वेकडील पेशिंग ला खिंडीतून चिनी पथके आलेली होती. सेलाला वळसा घालून चिनी सैन्य उतरू शकेल ही कल्पना ज. कौल यांना सुचली.

त्याला फार उशीर झाला होता. 'हा रस्ता खूप अवघड आहे' या फसव्या समजुतीवरच ते विसंबून राहिले.

१७ नोव्हेंबरच्या संध्याकाळपर्यंत सेना ते 'फूट हिल्स' मधला रस्ता चार ठिकाणी चिन्यांनी तोडला होता. भारताच्या सर्व प्रमुख


युद्धक्षेत्र वालाँग

ठाण्यांमधील दळणवळण बंद पाडण्याच्या दृष्टीने त्यांनी आखलेली योजना आता यशस्वी होत होती.

युद्धात सर्वांत महत्त्वाचे असते सैन्याचे व सेनाधिकाऱ्याचे मनोबल. आल्या संकटावर मात करण्याची विजयेच्छू ईर्ष्या! या वेळी भारतीय सेनाधिकारी नेमके इथेच कमी पडले. पुढे आलेल्या चिनी सैन्याची संख्या फार नसूनही 'आपण घेरले गेलो' या भीतीनं ज. पठानिया इतके खचले की माघारीखेरीज अन्य विचारही त्यांच्या मनात येईना! जिथला एक बाजीप्रभू तोफेचा आवाज येईपर्यंत जीवत जीव आणून झुंजतो, एक राणा प्रताप स्वकीयांच्या विरोधालाही न जुमानता दसपट मोठ्या फौजेला वर्षानुवर्षे झुंजवत ठेवतो, तिथल्या मातीत जन्मलेल्या सपुत्रांनी अशी हाय खावी यापेक्षा मोठे दुर्दैव म्हणजे ते काय!

याहीपेक्षा दुर्दैव म्हणजे त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही त्यांना धीर देण्याचे प्रेरणा देण्याचे सोडून थंडपणे 'जे जे होईल ते ते पहावे, असे अलिप्त धोरणच स्वीकारले.

सेना आघाडीवरचे प्रमुख होते ब्रिगेडियर होशियारसिंग! त्यांनी मात्र सुरक्षित अंतरापर्यंतच माघार घेऊन त्यापुढे मागे येण्याचे साफ नाकारले. ते म्हणाले, 'आम्ही जर मागे पळ काढला तर चिनी सैन्यही मोठ्या संख्येने आमच्या पाठी येईल आता मग मात्र सर्वच ठिकाणी अंदाधुंदी माजेल पण पठानिया 'माघारीच्या' हेक्याला सोडेनात. शेवटी नाईलाजास्तव त्यांनी एका पथकास मागे येण्याचा निर्णय घेतला.. पण याचा अत्यंत विपरित परिणाम ब्रिगेडमधील अन्य पथकांवर झाला ही बटॅलियन मागे फिरलेली पाहातच चिनी सैन्य तेथे आले व त्यांनी अकस्मात गोळीबार सुरू केला. भारतीय सैन्य प्रतिकाराऐवजी मागे हटू लागले. लवकरच शिस्त संपून सर्वत्र पळापळ सुरू झाली. जवानांचे नीतीधैर्यच कोसळले. त्यांना चिनी सैनिक टिपून टिपून मारू लागले. याच प्रवासात होशियारसिंग काही अधिकाऱ्यांसह मारले गेले.

या घनदाट पराभवाच्या छायेत काही तारे मात्र स्वत:च्या अमर पराक्रमाने उजळून गेले. लडाखमधील 'चुशुल' ठाणे



लढविणारा मेजर सैतानसिंग त्यापैकीच एक! चुशुल विमानतळाला लागून असलेल्या रेझांगला या पहाडावर त्यांची कुमाऊँ पलटण होती. अवघे दीडशे सैनिक पण खरोखरच आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाची आणि बलिदानाची आठवण व्हावी अशी झुंज त्यांनी दिली. कोसळत्या बर्फवृष्टीतही रक्ताचा शेवटचा थेंब शरीरात असेपर्यंत केवळ तिघेजणच तिथून मागच्या ठाण्यांवर आले. तीन महिन्यांनी जेव्हा भारतीय अधिकारी तेथे गेले तेव्हा सर्वच्या सर्व जवान आपापल्या शस्त्रांसह सज्ज स्थितीतच मृत्यू पावून बर्फात गाडले गेलेले त्यांना दिसले पण त्यांचे हे बलिदान पाहून चुशुल मधील ज. ग्रेवाल यांनी माघाराची परवानगी असतानाही आपले ठाणे सोडले नाही. एवढेच नव्हे तर रेझांगला जवळील विमानतळही त्यांनी चिन्यांच्या हाती पडू दिला नाही.

२० नोव्हेंबरला नेफातला संघटित प्रतिकार कोसळला ज. कौल तर खचलेच होते. त्यांनी प्रमुख कार्यालयच तेजपूरहून गौहाटीला हलवायचे ठरवले. चिन्यांच्या स्वारीने सामान्य जनताही हादरली होती. त्यांच्यात हिंमत निर्माण करणे हे खरं तर लष्करी अधिकाऱ्यांचे कर्तव्य होते पण ज. कौल यांची थंड डोक्याने विचार करण्याची शक्तीच नष्ट झाली होती.

आता मात्र सर्वसामान्य नागरिकांचीही तुफान पळापळ सुरू झाली. तीनशे माणसांच्या स्टीमर्समध्ये हजार हजार लोकं कोंबली गेली.

ज. थापर यांनी एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला. या सर्व पराभवाची जबाबदारी स्वीकारून त्यांनी आपला राजीनामाच पं. नेहरुंकडे सादर केला. जनरल जे. एन. चौधरी यांची नियुक्ती सैन्यप्रमुख म्हणून झाली.

या धक्क्यानंतर वीस नोव्हेंबरला चीनने एकतर्फी युद्धविराम घोषित केला. आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थांना ही वार्ता कळली पण भारत सरकारला याचा पत्ताच नव्हता. तेजपूरला पळापळ सुरू होताच तात्कालिन गृहमंत्री लालबहादुर शास्त्री आणि इंदिरा गांधींनी



युध्दक्षेत्र सेला

तेजपूरला जाऊन तेथील जनतेला धीर देण्याचे ठरवले होते. चिनी सैन्य कोणत्याही क्षणी तेथे थडकेल अशा अफवा असूनही त्यांनी हे धैर्य दाखवले हे विशेष! खरोखरच चिनी सैन्य तेजपूरपासून अवघ्या चाळीस मैलांवर येऊन ठेपले होते.

या युद्धातील जमा-खर्चाचा ताळेबंद मांडला तर चीनची मनुष्यहानी जास्त झाली हे दिसते परंतु नेफातील पळापळीमुळे सेनादल व जनता या दोघांच्याही नीतीधैर्यावर जो विपरित परिणाम झाला तो अधिक गंभीर होता. आपल्यापेक्षा चिन्यांचे डावपेच पराभवाचे द्योतक आहे.

आपले मर्यादित लक्ष्य (लडाख व नेफा भागातील काही प्रदेश) साधल्यावर अत्यंत मुत्सद्दीपणे बड्या राष्ट्रांना हस्तक्षेपाची संधी न देताच चीनने एकतर्फी युद्धविराम केला.

आपल्या परावाभवाचे विश्लेषण करणे म्हणजे उद्याच्या विजयाचा मार्ग आखणे! या युद्धातील आपल्या नामुष्कीला जबाबदार कोण?

१) पं. नेहरुंचा 'अहिंसा' व 'पंचशील' या तत्त्वातरील आंधळा विश्वास.
२) लष्करावर खर्च करणे म्हणजे 'विकासाला खीळ घालणे' असा हास्यास्पद गैरसमज.
३) शत्रूच्या खऱ्या हेतूविषयी व ताकदीविषयी बाळगलेला गाफीलपणा.
४) शस्त्रास्त्रे, युद्धोपयोगी साहित्य, जवानांचे ट्रेनिंग याकडे झालेले दुर्लक्ष.
५)आंतरराष्ट्रीय दडपणांचा स्वत:च उभारलेला बागुलबोवा
६) अयोग्य व्यक्तीची संरक्षणमंत्रीपदी नेमणूक (ज्यांनी लष्कराचे मनोधैर्य वाढविण्याऐवजी सतत गलिच्छ टीका करून ते खच्ची करण्यातच समाधान मानले) लष्करात गटबाजी आणि फाटाफूट निर्माण केली.
७) वरिष्ठ सेनाधिऱ्यांचे 'धरसोडी'चे धोरण व निश्चित निर्णय क्षमतेचा अभाव,
८) तिबेट व नेफा भागात योजनापूर्वक स्वसंरक्षणाची फळी न उभारणे (कित्येक उंच पहाडांवर चिन्यांनीच प्रथम ठाणी उभारली)

चीन हे आशियातील एक विस्तीर्ण आणि बलाढ्य राष्ट्र. असे राष्ट्र शेजारी असणे म्हणजे सदैव सज्जते शिवाय पर्यायच नाही. या युद्धातून घ्यायचे धडे आपल्या लष्कराने व राज्यकर्त्यांनी घेतलेच पण सामान्य जनतेनेही ह्याचा अभ्यास करून जाणून घेतले पाहिजे की नेमके काय घडले! कारण युद्ध काही फक्त राज्यकर्ते वा लष्कर लढत नाही. ज्या युद्धात सामान्य जनतेचा तन-मन-धन पूर्वक सहभाग नसेल ते युद्ध कितीही कर्तृत्त्वान नेता असो वा कितीही बलाढ्य नेता असो त्यांना जिंकता येणे अशक्य आहे. जनतेच्या मनात जर आत्मसन्मानाची नीतिधैर्याची आणि संकटाला सामोरे जाण्याची 'गुढी' सदैव उभी असेल तरच 'रामा' ला 'रावणवध' करणे शक्य होईल!

***

# वाचलेच पाहिजे असे काही!

चैत्राली देशमुख, ९ वी पुणे

## जावे त्यांच्या देशा

आपल्या प्रत्येकाच्या मनात परदेशी जाऊन रहावं, निरनिराळ्या, निसर्गाचं, कलेचं वरदान असलेल्या देशात आपलं नशीब आजमावावं असं वाटतं. काहीजण सहलीला म्हणून जातात. पण परदेशी जाताना होणारा अवाढव्य खर्च सामान्य माणसाला परवडण्यासारखा नाही. मग परदेशी जाता आले नाही अशी रुखरुख लागून राहते. पण 'दुधाची तहान ताकावर' ह्या न्यायाने पु.ल. देशपांडे लिखित 'जावे त्यांच्या देशा' हे प्रवासवर्णन वाचलं तर ही रुखरुख कमी व्हायला मदत होईल. पु.ल. देशपांडे हे त्यांच्या 'बटाट्याची चाळ', 'असा मी असा मी', 'अपुर्वाई' ह्या आणि अशा बऱ्याच विनोदी ललित संग्रहामूळे प्रसिद्ध आहेत.

'जावे त्यांच्या देशा' हे आपल्याला व्हेनिस मधे वर्षभर चालणाऱ्या उत्सवापासून फ्लोरेन्स मधल्या आद्य शंकराचार्यांचे भक्त असलेल्या डॉ. उगुच्चि ओनी यांच्या दालनात घेऊन जातात. तर हंगेरीतील बुडापेष्टमधल्या डॅन्यूब नदीच्या पुलावरून ते पेच मधील पोर्सेलिनच्या कलाकृती करणाऱ्या गेझाकाकांच्या म्यूझियम मधे घेऊन जातात.

न्यूयॉर्क हे सुंदर बगीचे, नद्या, गर्द झाडी, दिव्यांचा झगमगाट असलेले संपन्न शहर. पण तिथेही वाढती गुन्हेगारी. सधन आई-वडिलांचे घर सोडून पळून आलेल्या १६-१७ वर्षाच्या मूली ड्रग्ज, हाशीच्या आहारी गेलेल्या. युद्धात सक्तीने भरती केलेले पंचवीशीतील तरूण. एल.एस.डी., ड्रग्जच्या आहारी गेलेले. त्यांचची ही अवस्था वाहून खूप वाईट वाटते. पण याउलट अथांग सागर, नद्या, सरोवरे, डोंगरमाळा, चिमुकली घरे यांची सुवर्णनगरी 'सॅनफ्रान्सिस्को' 'घिराडेली' आणि 'गोल्डन ग्रेन कंपनी' ह्यांच्या अनोख्या जन्मकथा. भूकेबरोबरच मनेही फुलवणारी विश्रांतीगृहे आणि ह्या सगळ्याला शोभेल अशीच सभ्य संस्कृती.

प्रदेश अनोळखी, भाषेचा गंध नाही, ह्यामुळे कसे गमतीदार प्रसंग घडले ह्यासारखे विनोदी चुटकेही दिले आहेत. न्यूयॉर्कमध्ये पोस्ट-ऑफिसचा पत्ता विचारायला तेव्हा, तिथली म्हातारी देशपांडे यांना गुंड समजून कशी थरथर कापू लागली ह्याचेही मजेदार वर्णन आहे.

पण ही मजा मी सांगून उपयोग नाही. त्यासाठी तुम्ही 'जावे त्यांच्या देशा' हे स्वत:च वाचले पाहिजे. ते वाचताना तुम्ही त्यात इतके रमून जाल की ते क्षणभरही हातावेगळे करावेसे वाटणार नाही आणि तुम्ही दिवसा आपण अमेरिका, हंगेरीमधे आहोत अशी स्वप्ने पाहाल! **

## चला काम ओळखूया !

हा काय प्रकार आहे बुवा? हा तर एक गमतीचा खेळ आहे. अगदी ५/६ जणांच्या पासून वीस पंचवीस जणांनाही खेळता येईल असा! शिवाय मैदानाची आवश्यकताच नाही म्हणजे 'उन्हाळ्यात काय खेळायचं?' या प्रश्नालाही उत्तर!

**हा खेळ कसा खेहायचा?**

१) सर्व जणांनी गोल करून बसावे.

२) सुरुवातीला कोणत्याही एका भिडूवर राज्य द्यावे. त्यास नजरेच्या टप्प्यातून दूर जाण्यास सांगावे. तो पुरेसा दूर गेला की इतरांनी एकमेकांत ठरवावे. विशिष्ट काम नक्की करावे. उदा. रमेशच्या खिशातील पेन काढून रिंगणाच्या मध्यभागी ठेवायचे आहे. (हे काम अर्थातच 'राज्य' असलेल्याने ओळखून करावयाचे आहे.) एकदा काम निश्चित झाले की टाळ्या वाजवून त्याला परत येण्याचा संकेत करावा व टाळ्या वाजवीतच राहावे.

३) 'राज्य' असलेला भिडू आला की त्याने 'काय काम ठरवले असेल बरे?' हा विचार करून रिंगणास फेरी मारायला सुरुवात करावी. जसजसा तो 'रमेशच्या जवळ जाईल तसतसा इतरांनी टाळ्यांचा जोर व वेग वाढवून त्याला दिशा बरोबर आहे' अशी हिंट द्यावी.

४) जर तो रमेशला ओलांडून पुढे गेला तर टाळ्यांचा जोर जास्तीत जास्त करावा. आता त्याला समजले की 'रमेशच्या संदर्भात काहीतरी कृती करावयाची आहे.'

५) मग हा भिडू त्याला सुचलेल्या अनेक कृती करू लागेल. 'रमेशच्या डोक्यावर टप्पल मारणे, त्याला फेरी घालणे, वेडावून दाखवणे, त्याचा हात पकडणे, पट्टा काढणे, टोपी काढणे इ.' या सर्व कृती चुकीच्या आहेत त्यामुळे ह्या कृती तो करत असताना इतरांनी टाळ्यांचा जोर कमी करून 'त्या चुकीच्या आहेत' असा संकेत द्यावा.

६) अनेक कृती करता करता जर त्याने रमेशच्या खिशातील पेनला हात लावला तर पुन्हा टाळ्यांचा जोर वाढवावा व 'ही कृती योग्य दिशेने आहे' असा संकेत द्यावा.

७) आता तो भिडू पेन हातात घेऊन पुन्हा अनेक पर्याय शोधेल. उदा. दुसऱ्याच्या खिशाला लावणे, उडविणे, लिहिणे, शाई शिंपडणे इ. या प्रत्येकवेळी टाळ्यांचा जोर कमी करावा म्हणजे आपण पेनचा अजून काही वापर केला पाहिजे हे त्याला समजेल.

८) जेव्हा तो पेन रिंगणाच्या मध्यभागी ठेवण्याची कृती करेल तेव्हा टाळ्या एकदम थांबवण्यात म्हणजेच त्याने केलेली कृती बरोबर आहे हे त्याला कळेल.

**नियम :** १) एकावेळी एकावरच राज्य असेल.

२) खेळ चालू असताना कुणीही बोलायचे नाही वा हातवारे करायचे नाहीत.

३) सर्व संकेत केवळ टाळ्यांच्या माध्यमातूनच द्यायचे आहेत.

४) एका खेळाडूला 'काम ओळखण्याकरिता तीन मिनिटे द्यावीत. जर त्याला शोधता आले नाही तर सर्वानुमते काहीतरी शिक्षा करावी.'

५) ज्या व्यक्तीच्या संदर्भात काम असेल त्याला किंवा रिंगणात असलेल्यांपैकी 'राज्य' वाला भिडू ज्याला सांगेल त्याला पुढचे राज्य द्यावे. हा खेळ कितीही वेळ खेळता येईल. अनेक गंमती जंमतीची छोटी कामं तुम्हाला शोधता येतील. यात तुमच्या तर्कशक्तीला आव्हान तर आहेच शिवाय अनेक मित्रांबरोबर खेळण्याचा आनंदही!

# तुम्हीच संशोधक व्हा !

डॉ. नलिनी गुजराथी, पुणे

आजकाल बहुतेक सर्व शाळांमधून विज्ञान प्रकल्पांची प्रदर्शने भरविली जातात. जिल्हा पातळीवर, राजयपातळीवर विज्ञान प्रकल्पांच्या स्पर्धा होत असतात. ही प्रदर्शने पाहिली असता एक गोष्ट लक्षात येते की बहुतेक सर्व विद्यार्थी आणि त्यांचे शिक्षक हे प्रकल्प विषयाची ग्रंथालयातील पुस्तकातून संग्रहीत केलेली माहिती देत असतात. क्वचित प्रसंगी मॉडेल्स मांडली जातात पण प्रत्यक्ष प्रयोग करून बघण्यावर कुणाचा भर नसतो. वास्तविक प्रकल्प ही विद्यार्थ्यांना संशोधनाची ओळख करून देणारी अमुल्य संधी आहे. त्या दृष्टीने ज्यामुळे काही नवीन प्रयोग करता येतील. स्वत: गृहितके मांडून पडताळून बघता येतील अशा तऱ्हेचे विषय प्रकल्पासाठी विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी निवडले पाहिजेत.

माझ्या Ph.D. च्या संशोधनाच्या वेळी मी इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्याकडून असे काही छोटे संशोधन प्रकल्प करून घेतले होते. हे प्रकल्प विद्यार्थ्यांना गरज पडल्यास शिक्षकांची मदत घेऊन करून पाहता येतील, त्यामध्ये आणखी काही स्वत:ला सूचलेल्या प्रयोगांची भर टाकता येईल, त्यामध्ये आणखी काही स्वत:ला सूचलेल्या प्रयोगांची भर टाकता येईल, अशा स्वरूपाचे आहेत.

१) चेंडूचे टप्पे पडणे कशाकशावर अवलंबून असते ते पाहणे.

घरोघरी विविध प्रकारचे चेंडू खेळण्यासाठी आणले जातात उदा. पिंगपाँग, टेनिस, क्रिकेटचा बॉल, फुटबॉल, फ्लॅबर बॉल लहान मुलांचे मोठ्या आकाराचे प्लॅस्टिकचे बॉल इत्यादि.

समजा चेंडू एखाद्या टेबलाच्या कडेला ठेवला व त्याला अजिबात जोर न लावता हळूच ढकलले तर तो जमिनीवर पडून उसळी घेतो. चेंडू ज्या टेबलावरून टाकला ती उंची मोजा आणि चेंडूचा टप्पा जिथपर्यंत जातो ती उंची मोजा. यावरून चेंडूच्या टप्पे पडण्याचे प्रमाण आपल्याला काढता येईल.

$$\text{टप्पे पडण्याचे प्रमाण} = \frac{\text{पहिल्या टप्प्याची उंची}}{\text{चेंडू जिथून टाकला ती उंची}}$$

उंची मोजण्यासाठी तुम्हाला एक मीटरस्केल लागेल. चेंडूचे टप्पे पडणे कोणकोणत्या घटकांवर अवलंबून आहे बरं?

चेंडूचे वजन, चेंडूमधे भरलेली हवा, चेंडू तयार करण्यासाठी वापरलेले साहित्य, ज्या पृष्ठभागावर चेंडू उसळी घेतो तो पृष्ठभाग अशा विविध घटकांवर चेंडूच्या टप्प्याचे प्रमाण अवलंबून राहील. यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रयोगाची तुम्हीच रचना करा. एका वेळी एकाच घटकाचा परिणाम पाहायचा आणि उरलेले घटक नियंत्रित करायचे. उदा. चेंडूचे वजन या

घटकाचा परिणाम पहाण्यासाठी कोणकोणते पृष्ठभाग वापरू शकाल? स्टील, काच, फरशी, कडप्पा, लाकूड अशा विविध पृष्ठभागांवर चेंडूचे टप्पे कसे पडतात हे तुम्हाला पहाता येईल. या प्रयोगांमध्ये जे निष्कर्ष येतील ते तुम्ही आलेखाच्या सहायाने सुद्धा दाखवू शकाल. यासाठी पालकांची किंवा शिक्षकांची सुद्धा मदत घ्या. तुमचे निष्कर्ष आम्हाला जरूर कळवा.

**२) पानांपासून वीज मिळविता येईल का?**

झाडाच्या पानामध्ये कर्बग्रहणाची (photosynthesis) प्रक्रिया चालू असते हे आपल्या सगळ्यांना माहीत आहेच. या प्रक्रीयेमध्ये ज्या रासायनिक क्रिया घडत असतात त्यामध्ये मुक्त electrons निर्माण होतात. त्यामुळे झाडाचे पान हे एखाद्या छोट्या सेलप्रमाणे काम करू शकते. या पानाच्या सेलमधून आपल्याला वीज मिळविता येईल का? यासाठी खालील प्रयोग प्रथम करून पहा व नंतर त्यात भर घालून स्वत:चा प्रकल्प तयार करा.

खाली आकृतीत दाखविल्याप्रमाणे




एखाद्या झाडाची मोठी आणि जाड पाने घ्या उदा. कर्दळ, कोरफड, लिली, रबर इत्यादी पानाचा वरचा आणि खालचा पृष्ठभाग हा ब्लेडने थोडासा खरवडा (electric contact होण्यासाठी) पानाच्या वरच्या पृष्ठभागावर तांब्याची पातळ पट्टी +Ve electrode म्हणून ठेवा. हे दोन्ही electrodes पानापासून निसटू नयेत म्हणून एखाद्या प्लॅस्टिक क्लीपने (धुणे वाळत घालायच्या वेळी कपड्यांना लावायच्या क्लीपा) धरून ठेवा.

पहिल्या प्रथम एकाच पानापासून किती Current मिळतो हे multimeter वर अथवा Galvanometer वर मोजून पाहा. त्यासाठी तांब्याचा व जस्ताच्या electrode पासून वायर काढून multimeter ला जोडा, नंतर ३ किंवा ४ पाने ही आकृतीत दाखविल्याप्रमाणे सिरीजमध्ये जोडा व जास्ती Current मिळतो का ते पाहा. या प्रकल्पामध्ये नवीन नवीन गोष्टी शोधून काढायला पुष्कळच वाव आहे. उदा. पाने न तोडता झाडावरच ठेवून पानाची Cell तयार करून वीज मिळविता येईल का? कोणत्या प्रकारच्या झाडापासून जास्त वीज मिळविता येईल?

दहा वीस पानांचा ढीग करून जास्ती प्रमाणात वीज मिळविता येईल का? वेगवेगळ्या प्रकारचे electrodes वापरून काही फरक पडेल का? यामध्ये electronic circuit चा काही उपयोग करता येईल का? अशा प्रकारचे अनेक प्रश्न तुम्हालाही सुचू शकतील.

जर पानांपासून वीज मिळवून एखादा टॉर्च

बल्ब पेटवू शकलो तर केवढी मजा येईल! तर मग लागा खटपटीला.

३) आजकाल घराघरी फ्रीज पोहोचलेला आहे. या फ्रीजचा उपयोग करून तुम्हाला काही प्रकल्प करून पाहता येतील.

फ्रीजमध्ये ज्यावेळेला आपण कोथिंबीर, काकडी, टोमॅटो इत्यादी गोष्टी ठेवतो त्यावेळी दोन दिवसांनी टोमॅटो, पालेभाज्या यामधून पाणी बाहेर पडते व ह्यामुळे त्या भाज्या लवकर सडतात. विशेषत: कोथिंबीर, पालेभाज्या यांच्यावर हा परिणाम जास्त जाणवतो. समजा आपल्याला ही कोथिंबीर फ्रीजचा वापर करून जास्तीत जास्त दिवस ताजी व न सडता ठेवायची आहे तर मग यासाठी काय करावे लागेल, यासाठी वेगवेगळ्या प्रकारे कोथिंबीरीचे पॅकिंग करून बघा. ते एखादया स्टीलच्या उघड्या भांड्यात ठेवता येईल. कोथिंबीरीतील पाणी बाहेर पडले की पाने सुकून जातात. पूर्वी आपल्याकडे फ्रीजचा वापर नव्हता तेव्हा कोथिंबीरीची मुळासकटची गड्डी पाणी भरलेल्या पेल्यामध्ये ठेवण्याची पद्धत होती. तर मग दररोज एखादा तास कोथिंबीर बाहेर काढून पाणी भरलेल्या पेल्यामध्ये ठेवली व नंतर फ्रीजमध्ये ठेवली तर ती जास्त दिवस ताजी राहील का?

कोथिंबीर चिरलेली ठेवली, नुसती निवडून ठेवली किंवा मुळासकट ठेवली तर कोणत्या प्रकारे ती जास्त दिवस ताजी राहील? कोथिंबीरीतून बाहेर पडणारे पाणी शोषून घेण्यासाठी calcium chloride यासारख्या जलाकर्षक पदार्थांचा वापर करता येईल का?

त्यासाठी $CaCl_2$ चे खडे ठेवलेल्या छोट्या छोट्या पिशव्या, प्लॅस्टिकच्या डब्यांमध्ये ठेवून बघता येतील. सध्या सर्वसाधारणपणे कोथिंबीर ३ ते ४ दिवस फ्रीजमध्ये टिकू शकते. तुम्हाला हा कालखंड १०/१५ दिवसांपर्यंत वाढविता येईल का? जर तुम्हाला असे करण्यात यश मिळाले तर आम्हाला जरूर कळवा. ***

## जादूगाराची किमया

**चि. प्रताप माडगूळकर**

**दृश्य:** जादूगार टेबलावर काही चौकोनी कार्ड ठेवतो. त्यात प्रत्येकावर एक नाव असते. (उदा. भारत, रशिया, इंग्लंड) व तो एक जादूची काठी घेऊन त्यावर फिरवतो. त्याचबरोबर भारत लिहिलेले कार्ड वरती येते.

**साहित्य :** कार्डशीट, ब्लेड, लोहचुंबक, फेव्हिकॉल

**कृती :** समान आकाराची कार्डशीट कापून घ्या व त्यावर देशांची नावे टाका भारत या देशामागे ब्लेड चिकटवा व ज्या रंगाचा कार्डशीट असेल त्या रंगाचा कागदाचा तुकडा मागे लावा. म्हणजे ब्लेड दिसणार नाही. जादूची काठी म्हणजे इलेक्ट्रिक नळ्या असतात. त्यापैकी एक छोटी नळी घ्या त्याला एका बाजूने लोहचुंबक चिकटवा म्हणजे भारत देशाला आपली जादूची काठी चिकटेल.

# माझ्या शिक्षणाची सुरुवात

कु. मानसी खळदकर

आमच्या वर्गात मराठीचा तास चालू होता. तेव्हा कोणत्या तरी धड्याला अनुसरून बाई ''शिक्षणाने माणूस सुसंस्कृत बनतो'' हे वाक्य म्हणाल्या आणि हे वाक्य ऐकून नकळत माझे मन भूतकाळात गेले.

अपंग म्हटला की समाजाकडून त्याची हेटाळणी होतेच. मी मानसी श्रीकांत खळदकर स्पॉस्टिक आहे. याला वैज्ञानिक भाषेत सेरिब्रल पालसी म्हणतात. प्रथम मला लिहायला खूप त्रास व्हायचा. अगदी पेन्सिल धरण्यापासून लिहिण्यापर्यंत सगळं काही मला माझ्या घरच्या मंडळींनी शिकवलं. माझे बालवाडीतील शिक्षण हे जवळच्या शाळेतच पार पडलं. मला ही पहिल्यापासून शिक्षणाची खूप आवड होतीच.

आता पहिलीत जायची वेळ आली. माझ्या बाबांनी एका चांगल्या प्रथितयश शाळेत माझं नावही घातलं. बाबांनी मुख्याध्यापकांना माझ्याबद्दलची सर्व कल्पनाही दिली होती. शाळेत प्रवेश घेण्याआधी माझी बुध्द्यांक चाचणीही घेण्यात आली. या चाचणीवरून मला सामान्य मुलांच्या शाळेतच घालावं असा डॉक्टरांचा अभिप्राय होता. तोही बाबांनी मुख्याध्यापकांना सांगितला व सर्व पैसे भरून शाळेत प्रवेश घेतला.

माझ्या शाळेचा पहिला दिवस उजाडला. आज मी एका चांगल्या शाळेत जाणार या विचाराने खूप आनंदात होते. शाळेचं दप्तरसुद्धा मी भरलं. शाळेचा पहिला दिवस म्हणून आई बाबा दोघेही माझ्याबरोबर आले. मला कोणत्या वर्गात बसवायचे हे विचारायला जेव्हा माझे बाबा मुख्याध्यापकांकडे गेले तेव्हा ते म्हणाले, 'मी तुमच्या मुलीला शाळेत प्रवेश देऊ शकत नाही कारण अशा मुलांमुळे आमच्या शाळेचा दर्जा घसरेल. तेव्हा त्यांना आई जे एक वाक्य म्हणाली. ते अजूनही मला आठवते. ''केवळ अशा मुलांमुळे तुमच्या बोलण्यावरूनच आम्हाला तुमच्या शाळेचा दर्जा समजला. मला माझ्या मुलीला तुमच्या शाळेत अजिबात घालायचे नाही.''

आम्ही घरी आलो. आई तर पूर्णपणे निराश झाली. माझ्या भावनांचाही विरस झाला. मग बाबा पद्मावती अरण्येश्वर माध्यमिक विद्यालयाच्या शाळेत गेले. येथील मुख्याध्यापिका सौ. बरसोडे बाई यांनी मात्र मला क्षणाचाही विलंब न करता शाळेत प्रवेश दिला. या घटनेने माझा ''शिक्षणाने माणूस सुसंस्कृत बनतो'' या वाक्यावरचा विश्वास उडाला. 'खरा सुसंस्कृतपणा हा त्याच्या मनावरच अवलंबून असतो.'

अशी आहे माझ्या शिक्षणाची करुण कहाणी. असे अनेक प्रसंग माझ्या आयुष्यात येऊन गेले. या प्रसंगांवर मात करताना मात्र त्यांनी मला खंबीर बनवले.

शाळा सुटली की सर्व मुले भरभर पळत पळत घरी जायची ते पाहून मला रडू यायचं. अशी मी दुसरीपर्यंत रडायचे. आई आपल्याला घ्यायला येते की नाही याचं सतत दडपणं

असायचं मला सोसायटीत खूप मैत्रिणी आहेत. त्या आणि मी तासनतास बालपणी भातुकली खेळायचो. मात्र संध्याकाळी जेव्हा त्या पळापळी खेळायच्या तेव्हा त्यांचा खेळ पाहून मला आपल्या व्यंगाची आठवण व्हायची पण क्षणभरच! नंतर मात्र मी त्यांचा खेळ पाहाण्यात रममाण होऊन जायची. माझ्या मैत्रिणींनी मला कधी माझ्यातल्या व्यंगाची आठवण होऊ दिली नाही. उलट तू ही एक ना एक दिवस आमच्या सारखी पळू शकशील असा आत्मविश्वास त्यांनी मला मिळवून दिला.

हळू हळू मला धरून चालता येऊ लागलं. मग मीही त्यांच्याबरोबरीनं आजीचा हात धरून पळू लागले. आजीने मला पत्ते खेळायला शिकवले. मला स्ट्रायकर बोटात धरता येत नव्हता. तरीही आपल्याला बैठ्या खेळाशिवाय पर्याय नाही हे जाणून मी आजी कडून जिद्दीने कॅरम शिकून घेतला. हळूहळू मला वाचनाची गोडी लागली. मग आजी, आजोबा, मावशी मला चांगल्या लेखकांची पुस्तके आणून देऊ लागले. माझ्या जीवनात एक विरंगुळा निर्माण झाला. जीवनाला तजेलदारपणा आला.

माझ्या शाळेतल्या मैत्रिणींनी आत्त्तापर्यंत माझ्याबद्दल कधीही तक्रार केली नाही. माझ्या शाळेतल्या बाईंनी माझ्यात होत असलेल्या नवीन प्रगतीला सतत प्रोत्साहन दिलं.

मी ४ थीत असताना सहज 'सकाळ' मध्ये आईच्या वाचनात आलं 'लायन्स क्लबतर्फे वक्तृत्व स्पर्धा' हे वाक्य वाचून आईनं माझं नाव वक्तृत्त्वासाठी दिलं मीही चांगली तयारी केली. प्रत्यक्षात स्पर्धेच्या ठिकाणी गेल्यावर मी थोडी घाबरले. आपल्या बोलण्याला व व्यंगाला कोणी हसेल का? एवढ्या चांगल्या बोलणाऱ्या मुलांपुढं आपला टिकाव लागेल का? असे विचार मनात आले परंतु स्टेजवर गेल्यावर माझी भीती पळाली. माझं भाषण दणक्यात झालं. टाळ्यांचा कडकडाट झाला आणि या स्पर्धेत मला बक्षीस मिळालं. हे बक्षीस मिळाल्यामुळे माझा आनंद गगनात मावेना. तेव्हा मला आई जे एक वाक्य म्हणाली होती त्याचा माझ्या मनावर खोल परिणाम झाला. आई म्हणाली होती, ''मानसी, माणसाने आपल्यातल्या व्यंगाची उणीव दुसऱ्या एखादया चांगल्या गुणाने भरून काढायची असते.''

माझ्यात जेव्हा हळूहळू सुधारणा झाली तेव्हा मी काठी घेऊन शाळतून एकटी येऊ लागले. प्रथम प्रथम घरी येत असताना लोक सतत माझ्याकडे बघायचे. हे त्यांचे बघणे म्हणजे मला तो माझा अपमान वाटायचा व घरी आले की माझ्या डोळ्यात पाणी यायचे. आई मला वारंवार म्हणायची ''मानसी, तू जर मी अपंग आहे म्हणून लोक माझ्याकडे बघतात या क्षुल्लक कारणाने रडत राहिलीस तर तू आयुष्यात काहीच साध्य करू शकणार नाहीस. या आयुष्यात तुला कितीतरी संकटांना तोंड दयायचे आहे त्यासाठी तुला खंबीर बनायला हवे.''

अशा प्रकारे मैत्रिणींचे सहकार्य, गुरुजनांचे प्रोत्साहन आई बाबांनी माझ्यात निर्माण केलेला जबरदस्त आत्मविश्वास, कठोर परिश्रम, जिद्द या गुणांमुळे माझ्या आयुष्यातील माझी वाटचाल सुरळीत सुरू आहे. यापुढे ती अशीच चालू राहील असा मला विश्वास वाटतो.

***

सुट्टीत ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष संधी !

छात्र **प्रबोधन**

## ज्ञान प्रबोधिनीद्वारा आयोजित

### स्वयं अध्ययन कौशल्ये प्रशिक्षण वर्ग

**अभ्यास कसा करावा हे जाणून घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या वर्गाचे आयोजन आधुनिक तंत्रे, प्रात्यक्षिके व सराव पाठ यांच्या साहाय्याने या वर्गात येऊन शिका –**

- ★ आपला वाचनवेग कसा वाढवावा?
- ★ आपले आकलन कसे सुधारावे?
- ★ स्मरणशक्ती कशी वाढवावी
- ★ टिपणे कशी काढावीत?
- ★ मुद्देसूद सुंदर शैलीत कसे लिहावे?
- ★ अभ्यासाचे नियोजन कसे करावे?
- ★ परीक्षेची पूर्वतयारी कशी करावी?

### प्रतिभा विकसन वर्ग

**अमेरिकेसारख्या पाश्चात्य देशातील शिक्षणामध्ये शिकविली जाणारी प्रतिभा विकसनाची आधुनिक तंत्रे आपल्या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी या वर्गाचे आयोजन.**

**या वर्गामध्ये येऊन –**

- ★ आपली निरीक्षणशक्ती, जिज्ञासा वाढवा!
- ★ आपल्या कल्पनाशक्तीला पंख फुटू द्या!
- ★ कविता, कथा, निबंध या द्वारा सृजनाचा आनंद लुटा!
- ★ विज्ञानातील मुक्त प्रयोगांद्वारा प्रतिभेचा आविष्कार करा!

**वरील दोन्ही वर्ग स्वतंत्रपणे पण एकाच वेळेस**

**कालावधी** : दररोज तीन तास याप्रमाणे सहा दिवसांची एक अशा ३ बॅचेस खालीलप्रमाणे घेतल्या जातील.
**बॅच १ :** दि. ९ मे ते १४ मे
**बॅच २ :** दि. १६ मे ते २१ मे
**बॅच ३ :** दि. २३ मे ते २८ मे

**वेळ** : दररोज दुपारी २.३० ते ५.३०

**स्थळ** : ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, ५१० सदाशिव पेठ, पुणे ३०

**शुल्क** : रु. १००/–

**नावनोंदणी** : छात्र प्रबोधन कार्यालय, ज्ञानप्रबोधिनी, पुणे ३०. संध्याकाळी ५ ते ७ या वेळात (रविवार सोडून) नावनोंदणी दि. २ मे पासून सुरू.

टपाल नोंदणी क्र. छात्र प्रबोधन – PNCW/349 तिकिटाशिवाय पाठविण्याचा क्र. १२८

# आम्ही जाऊच जाऊ

अदम्य अपुल्या आकांक्षांचे गीत आजला गाऊ
जिथे जायचे ठरले तेथे, तेथे जाऊच जाऊ, आम्ही जाऊच जाऊ ।।धृ।।
नवतेजाप्रत नवक्षितिजांच्या दौडत दौडत जाऊ
क्षणभर सांगुन मनिचे हितगुज स्वप्ने नव रंगवू
नवीन कवने, नव्या कहाण्या नव स्फूर्तीने गाऊ
जिथे जायचे ठरले तेथे, तेथे जाऊच जाऊ, आम्ही जाऊच जाऊ ।।१।।
नसति भाषणे जीवन ध्येये ही तर अमुची सारी
यत्न शिंपुनी फुलवू क्षेत्रे कर्तृत्वाची न्यारी
इतिहासाची दिशा पालटू महान मानव घडवू
जिथे जायचे ठरले तेथे, तेथे जाऊच जाऊ, आम्ही जाऊच जाऊ ।।२।।
कधी न रुसणे, कधी न रडणे, ना कधी थकणे, सदा पुढे चालणे
एकचि निश्चय झाला अमुचा राष्ट्र पुन्हा उभविणे
दुर्गमतेची तमा न आम्हा पाऊल पुढेच ठेवू
जिथे जायचे ठरले तेथे, तेथे जाऊच जाऊ, आम्ही जाऊच जाऊ ।।३।।
निश्चय, निष्ठा, नीती यांचे कंकण बांधुन हाती
व्रतस्थ होऊनि व्यापुनि टाकू विश्वाच्याही मिती
विश्वविजेते हिंदुराष्ट्र ते पुन्हा जगाला दावू
जिथे जायचे ठरले तेथे, तेथे जाऊच जाऊ, आम्ही जाऊच जाऊ ।।४।।

## ● संपर्क पत्ता ●

संपादक, छात्र प्रबोधन,
ज्ञान प्रबोधिनी,
५१०, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०
☎ ४३२६९१

कार्यालयाची वेळ : स. १० ते १२
संध्या. ५ ते ७.

वार्षिक वर्गणी : रुपये ४०/– फक्त.